स्वागत नववर्ष 2026

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १७५ ■ गुरूवार, दि. १ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.-MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 ■ http://epaper.citynewssuperfast.com

संकल्प करूया साधा, सरळ, सोप्पा
दुसऱ्याच्या सुखासाठी मोकळा करूया
हृदयाचा एक छोटासा कप्पा !
नववर्षाच्या शुभेच्छा !

# शिंदेंच्या उमेदवाराविरुद्ध ठाकरेंच्या उमेदवाराची माघार

## जळगाव महानगरपालिका निवडणुकीत मोठा बदल

प्रतिनिधी १ जानेवारी

**जळगाव :** राज्यातील महापालिका निवडणुकांध्ये उमेदवारी अर्जांची छाननी झाल्यानंतर राजकीय चित्र अधिक स्पष्ट होत आहे. जळगाव मनपा निवडणूक प्रभाग क्रमांक १८ अ मधील उमेदवार तथा आमदार चंद्रकांत सोनवणे यांचे चिरंजीव डॉ. गौरव सोनवणे यांची बिनविरोध निवड जवळपास निश्चित झाली आहे. कारण, येथील गौरव सोनवणेंच्या विरोधातील उद्धव ठाकरेंच्या शिवसेना पक्षाचे उमेदवार मयूर सोनवणे यांनी माघार घेतल्याने शिवसेना शिंदे गटाचे डॉ. गौरव सोनवणे हे बिनविरोध निवडून आले आहे. राज्याचे भाजपचे ६ उमेदवार विजयी झाल्यानंतर आता जळगावत शिवसेना शिंदे गटाचा एक उमेदवार विजयी झाल्याने महायुतीचे राज्यात ७ उमेदवार बिनविरोध झाल्याचं पाहायला मिळत आहे. त्यामध्ये, शिंदेंच्या शिवसेनेनं आज खातं उघडलं आहे.

जळगाव महानगरपालिका निवडणुकीसाठी दाखल झालेल्या १०३८ उमेदवारी अर्जांची बुधवारी छाननी करण्यात आली. या प्रक्रियेत १९ प्रभागांतील एकूण १३५ अर्ज बाद ठरले आहेत. एकूण ९०३ अर्ज वैध घोषित करण्यात आले आहेत. छाननीदरम्यान तांत्रिक त्रुटी आणि राजकीय समन्वयाच्या अभावामुळे अनेक दिग्गजांचे अर्ज बाद झाले. याचा सर्वात मोठा फटका भाजपच्या माजी महापौर जयश्री धांडे यांना बसला. त्यांच्या एबी फॉर्मवर स्वाक्षरी नसल्याने त्यांचा अर्ज रद्द करण्यात आला. परंतु, सुदैवाने त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला असल्यामुळे त्या आता भाजप पुरस्कृत उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात असतील. त्यासह, जळगावातील प्रभाग क्रमांक १८ अ मध्ये आमदारपुत्र बिनविरोध झाल्याने सर्वांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. आमदारपुत्र बिनविरोध, ठाकरेंच्या उमेदवाराचा अर्ज मागे

भाजपचे कल्याण डोंबिवलीत ३, पनवेलमध्ये १, धुळ्यात २ उमेदवार बिनविरोध आले आहेत, त्यानंतर आता शिंदेंचा जळगावचा उमेदवार बिनविरोध झाला आहे. जळगाव मनपा निवडणूक प्रभाग क्रमांक १८ अ मधील उमेदवार तथा आमदार चंद्रकांत सोनवणे यांचे चिरंजीव डॉ. गौरव सोनवणे यांची बिनविरोध निवड जवळपास निश्चित झाली आहे. कारण, येथील गौरव सोनवणेंच्या विरोधातील उद्धव ठाकरेंच्या शिवसेना पक्षाचे उमेदवार मयूर सोनवणे यांनी माघार घेतल्याने शिवसेना शिंदे गटाचे डॉ. गौरव सोनवणे हे बिनविरोध निवडून आले आहे.

## कुत्र्याच्या खाजीचा माणसावरील रोगाचा

प्रतिनिधी १ जानेवारी

**अकोला:** कुत्र्याच्या खाजीचा माणसावरील रोगाचा पहिला रुग्ण उरळ ब. येथे आढळला. यामुळे संपूर्ण गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या बाबत आरोग्य यंत्रणा दुर्लक्ष करत असल्याचा आरोप गावकरी करीत आहे. गेल्या अनेक महिन्यापासून उरळ गावात कुत्र्यांवर खाजीचा प्रादुर्भाव झाल्याने याची लागण आता गावकऱ्यांना होत आहे. गावातील अनेक व्यक्ती तसेच लहान मुलांना या खाजीचा प्रादुर्भाव झाल्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. गावातील अनेक नागरिकांनी आरोग्य विभागाकडे याबाबत तक्रार करून आरोग्य विभाग कुंभकर्णी झोपेत असल्याचे दिसून येत आहे.

## एबी फॉर्मवरील डिजिटल सही अनेक उमेदवारांचा घात करणार?

प्रतिनिधी १ जानेवारी

**मुंबई :** महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर आज त्याची छाननीही पार पडली. आता पुढील दोन दिवस उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. पण त्याआधीच शिवसेनेने मोठा दावा करत अनेक उमेदवारांची धडधड वाढविली आहे. अनेक पक्षांच्या उमेदवारांच्या ए व बी फॉर्मवर डिजिटल सही असून ते बेकायदेशीर आहे. त्यामुळे त्यांची उमेदवारी रद्द करावी, अशी मागणी शिवसेनेने थेट राज्य निवडणूक आयोगाकडे केली आहे. शिवसेनेचे राज्यसभेचे खासदार मिलिंद देवरा यांनी निवडणूक आयोगाला पत्र पाठवून ही बाब निदर्शनास आणून दिली आहे. महापालिका निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी बहुतांश पक्षांनी निवडणूक आयोगाच्या नियमांचं थेट उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्याचे देवरा यांनी पत्रात म्हटले आहे.

# ‘वंचित’ महापालिकेत वंचित ठरणार का?

## ५३ उमेदवार जाहीर; तब्बल २७ जागांवर ‘वंचित’च गायब

प्रतिनिधी १ जानेवारी

**अकोला :** अकोला महानगरपालिका निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना पर्याय देण्याचा दावा करणाऱ्या वंचित बहुजन आघाडीची उमेदवारी यादीच अर्धवट ठरल्याचे चित्र समोर आले आहे. पक्षाने ५३ उमेदवार जाहीर केल्याचा गाजावाजा केला असला तरी शहरातील चार संपूर्ण प्रभागांसह तब्बल २७ जागांवर वंचितचा एकही उमेदवार नसल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. वंचित कोणाची बी टिम आहे असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. काँग्रेस सोबत आघाडी न करता वंचितने एकला चालो रे ची भूमिका ठेवली. तरी पक्षाला ८० उमेदवार मात्र मिळाले नाही. जिल्हा परिषदेत सत्ता हेच लक्ष असताना पक्षाजवळ महापालिकेत ८० उमेदवार नसणे हे संघटनेचा




बोजवारा उडाल्याचे चित्र आहे.

महानगरपालिका निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीने पश्चिम भागातील ३२ तर पूर्व भागातील २१ जागांसाठी उमेदवार जाहीर केले आहेत. मात्र प्रत्यक्षात प्रभाग क्रमांक ६, ११, १५ व २० या चार प्रभागांतील प्रत्येकी चारही जागा रिक्त राहिल्या आहेत. याशिवाय प्रभाग क्रमांक १ मधील १, प्रभाग ५ मधील २, प्रभाग १० मधील ३, प्रभाग १२ मधील २, प्रभाग १६ मधील १ आणि प्रभाग १७ मधील २ जागांवरही पक्षाचा उमेदवारच नाही.संपूर्ण प्रभागच सोडून देण्याचा निर्णय आहे की ही संघटनात्मक अपयशाची कबुली, असा थेट सवाल आता उपस्थित केला जात आहे.

निवडणूक रिंगणात उतरण्याचा दावा करणाऱ्या पक्षाकडून प्रत्येक प्रभागात लढण्याची तयारीच नसल्याचे स्पष्ट होत असल्याची चर्चा रंगू लागली आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत, निवडणूक चिन्हांचे वाटप आणि प्रचाराचा धडाका सुरू असतानाच उमेदवार नसलेल्या २७ जागांबाबत वंचित बहुजन आघाडी कोणती भूमिका घेणार असा प्रश्न उपस्थित होत आहे. समर्थन, अप्रत्यक्ष युती की मौन याबाबत पक्षाकडून अद्याप स्पष्टता नसल्याने राजकीय तर्कवितर्कांना उधाण आले आहे. महानगरपालिकेच्या सत्तासंघर्षात ‘निर्णायक भूमिका’ बजावण्याचा दावा करणाऱ्या वंचित बहुजन आघाडीसमोरच आता विश्वासार्हतेचा प्रश्न उभा ठाकला आहे.

# तंबाखू मागण्यावरून झालेल्या वादात एकाची हत्या

प्रतिनिधी १ जानेवारी

**अकोला:** येथील सिव्हिल लाईन्स पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या कृषी नगर परिसरात ३१ डिसेंबरच्या रात्री एक धक्कादायक घटना घडली. केवळ तंबाखू मागण्यावरून झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर हत्येत झाले. संतोष गावडे नामक व्यक्तीवर लोहेच्या रॉडने हल्ला करण्यात आला, ज्यात त्यांचा वेदनादायक मृत्यू झाला. या घटनेमुळे कृषी नगर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. ३१ डिसेंबरच्या रात्री राम गिराम आणि संतोष गावडे यांच्यात तंबाखू मागण्यावरून बाचाबाची झाली. पाहता पाहता या वादाने हिंसक वळण घेतले. रागाच्या भरात येऊन राम गिरामने जवळच असलेल्या लोखंडी रॉडने संतोषवर हल्ला केला. रामने संतोष यांच्यावर सपासप वार केले, ज्यामुळे ते गंभीर जखमी झाले. एवढ्यावरच न थांबता, आरोपीने संतोष यांना रक्ताच्या थारोळ्यात असलेल्या अवस्थेत काही अंतरापर्यंत फरफटत नेल्याची माहिती समोर येत आहे.घटनेची माहिती मिळताच सिव्हिल लाईन्स पोलीस ठाण्याचे अधिकारी तातडीने घटनास्थळी पोहोचले.

# सरकारी कर्मचाऱ्यांना बंपर पगार वाढ!

## आठव्या वेतन आयोगात शिपायाला 45000 तर सचिवांना 5 लाख पगार

वृत्तसंस्था १ जानेवारी

**नवी दिल्ली :** कर्मचाऱ्यांसाठी ८वा वेतन आयोग बंपर, १ जानेवारीपासून शिपायाला ४५०००, तर सचिवांना ५ लाख रुपये पगार मिळणार आहे. नवीन वर्षापासून पगारात वाढ होत आहे. लेव्हल १ ते लेव्हल १८ पर्यंतच्या कर्मचाऱ्यांच्या पगारात मोठी वाढ होणार आहे.

केंद्र सरकारने ८व्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीला मंजुरी दिली आहे. १ जानेवारीपासून ८वा वेतन आयोग लागू होत आहे. नवीन वर्षापासून केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारात मोठी वाढ होणार आहे. नवीन वर्षासाठी केंद्र सरकारने कर्मचाऱ्यांना बंपर गिफ्ट दिले आहे. यामुळे केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या लेव्हल १ ते लेव्हल १८ पर्यंतच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ होणार आहे.



पगारवाढीचे वैशिष्ट्य म्हणजे मूळ वेतनात मोठी वाढ होत आहे. यामुळे प्रत्येकाच्या पगारात लक्षणीय वाढ होणार आहे. यासोबतच महागाई भत्ता, दैनिक भत्ता यासह इतर सुविधांचाही समावेश असेल. यामुळे हातात येणारा पगार दुप्पट होणार आहे.

VCCI विदर्भ चेम्बर ऑफ कॉमर्स अँन्ड इंडस्ट्री
अकोला द्वारा आयोजीत
WESTERN VIDARBHA'S LARGEST B2B & B2C PLATFORM
Event Sponsor Marvel Trinity Real Estate LLP
VITEX 2026 Vidarbha Industry & Trade Expo
Co-Sponsor विठ्ठल Vitthal
अकोला शहर में फिर एकबार
सभी बडे व छोटे उद्योजक - व्यापारियों की
190 स्टॉल्स की भव्य व्यापार प्रदर्शनी
जहॉं आपको मिलेंगे जीवनावश्यक व गृहपयोगी उत्पादन
एकही छत के नीचे
प्रदर्शनी दौरान ज्ञानवर्धक सेमीनार : हरदिन - दोपहर 4.00 बजे
म्युझिकल नाईट एवं सांस्कृतिक कार्यक्रम : हरदिन - शाम 7.00 बजे
VITEX 2026 में अपने परिवार और मित्रों के साथ आईये...
साथ ही फ़ूड कोर्ट में आस्वाद लीजिये विविध प्रकार के व्यंजनों का....
FREE ENTRY
VITEX 2026
FREE PARKING
दिनांक : 2, 3, 4 एवम 5 जनवरी 2026...
समय : सुबह 10.00 से रात 9.00 बजे तक....
स्थल : गौरक्षण संस्थान ग्राउंड, गौरक्षण रोड, अकोला

# विदर्भ चेंबरच्या विटेक्स 2026 प्रदर्शनीचा उद्या थाटात प्रारंभ

VITEX 2026 Vidarbha Industry & Trade Expo

## 190 पेक्षा जास्त विविध उत्पादनांचे स्टॉल्स राहणार

प्रतिनिधी १ जानेवारी

**अकोला:** विदर्भ चेम्बर ऑफ कॉमर्स एन्ड इंडस्ट्रीच्या वतीने तसेच मुख्य प्रायोजक मार्वल ट्रिनीटी रियल एस्टेट एलएलपी व सह प्रायोजक विठ्ठल ऑईल असणाऱ्या विटेक्स प्रदर्शनीचा शुक्रवार, २ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता गोरक्षण रोड येथील गोरक्षण संस्थान ग्राउंडवर मोठ्या उत्साहात प्रारंभ होत आहे. प्रदर्शनी ५ जानेवारी २०२६ पर्यंत सकाळी १० वा ते रात्री ९ वाजेपर्यंत सर्व नागरिकांसाठी मोफत सुरू राहणार आहे. या विशाल प्रदर्शनीत १९० पेक्षा जास्त स्टॉल्स राहणार असून या माध्यमातून परिसरातील लहान मोठे उद्योग, व्यापारी, सेवा प्रदाता व स्टार्ट-अप्स द्वारे आपले सर्वश्रेष्ठ उत्पादने व सेवांचे प्रदर्शन व विक्री या प्रदर्शनीत करणार आहेत.

विदर्भ चेंबरचे अध्यक्ष व प्रदर्शनीचे संयोजक निकेश गुप्ता यांच्या अध्यक्षतेत आयोजित या प्रदर्शनीचे उद्घाटन २ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर यांच्या हस्ते होईल. प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे गृहराज्यमंत्री पंकज भोयर, खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर,आमदार वसंत खंडेलवाल, माजी आ. गोपीकिसन बाजोरिया, कॅटचे राष्ट्रीय अध्यक्ष बी.सी.भरतीया, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष रवींद्र माणगावे,मार्वल ट्रिनीटीचे भागीदार सुनील ईण्णानी,कालूराम फुडसचे संचालक शिवप्रकाश रुहाटीया, माजी महापौर विजय अग्रवाल, पुण्याचे जेष्ठ उद्योजक चंद्रकांत ठक्कर,कॅटचे राष्ट्रीय सचिव अशोक दालमिया,अकोला इंडस्ट्री असोसिएशन चे अध्यक्ष मनोज खंडेलवाल यांची उपस्थिती राहील.

या चार दिवसीय प्रदर्शनीत सोलर पॅनल्स व फिटिंग्स, फर्निचर,गृहपयोगी साहित्य, होम डेकोर व इंटीरियर डिझ़ाइनिंग, गिफ्ट आर्टिकल्स, डिजाइनर कपड़े,ऑटोमो बाइल्स, स्पोर्ट्स व फिटनेस,





रोबोटिक्स, वेलनेस सेक्टर, वॉटर ट्रीटमेंट सॉल्यूशन, एग्रो प्रोसेसिंग यूनिट्स साठी मशीनरी व साहित्य, डेयरी प्रोडक्ट्स,प्री- फैब्रिकेटेड स्ट्रक्चर,बैंकिंग,फाइनेंस सेवा, करियर गाइडेंस,गृह निर्माण,अकाउंटिंग,सॉफ्टवेयर, किचेन युटेन्सिल, थरमोवेर समवेत व्यापारी व नित्य उपयोगी पडणारे सर्व उत्पादने व सेवा राहणार आहेत.या प्रदर्शनीत नागरिक, व्यापारी,उद्योजक व विद्यार्थ्यांच्या नित्य उपयोगी पडणाऱ्या तांत्रिक व शैक्षणिक सेमिनार ही होणार आहेत.

या तांत्रिक कार्यशाळेत २ जानेवारी रोजी दु ४ वाजता प्रमुख पाहुणे एमएसएमईचे नागपूरचे संचालक विजय शिरसाट,उद्योग विभागाचे संयुक्त संचालक निलेश निकम यांच्या उपस्थितीत व प्रकल्प प्रमुख मधुर खंडेलवाल, संतोष छाजेड, प्रणय कोठारी यांनी साकार केलेल्या या कार्यशाळेत वक्ते सुहास बुद्धे नागपूर हे लोकल टू ग्लोबल या विषयांवर स्थानीय उत्पादन जागतिक बाजारात कसे न्यावे यावर व्याख्यान देणार आहेत.या नंतर सीए यशवंत भोजवाणी नागपूर हे एमएसएमई मध्ये शासकीय सबसिडी, सरकारी अनुदानातून उद्योगाला कशी गती द्यावी व एमएसएमई मध्ये संधी यावर मार्गदर्शन करणार आहेत.शनिवार दि ३ जानेवारी रोजी दु ४ वाजता प्रमुख पाहुणे महाराष्ट्र चेंबरच्या उपाध्यक्ष संगीता पाटील व स्टेट टॅक्स विभागाच्या उपायुक्त अर्चना चव्हाण ,पैं सौ राधिका खटोड यांच्या उपस्थितीत प्रकल्प प्रमुख दिपाली देशपांडे, रजनी महाले, रविता शर्मा, लीना आर्या यांनी साकार केलेल्या कार्यशाळेत हैदराबाद येथील आर्टिफिशियल इंटेलिजन्स तज्ञ श्रीमती स्नेहल बडोतकर या व्यापारासाठी आर्टफिशीयल इंटेलिजन्सचा मार्ग यावर तथा मुंबई येथील डिजिटल मार्केटिंग तज्ञ श्रीमती अश्विनी देसाई या व्हाट्सअपच्या माध्यमातून व्यापार या विषयावर कार्यशाळा सादर करणार आहेत. रविवार दिनांक ४ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता चेंबरचे माजी अध्यक्ष अशोक गुप्ता,कॅट टीम विदर्भचे चेअरपर्सन वसंत बाछुका यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यशाळेत मुंबईचे हुमन रिसोर्स तज्ञ सारंग गोडबोले हे वर्कफोर्सचे व्यवस्थापन करून उद्योग व्यापाराला कसे विकसित करावे यावर मार्गदर्शन करणार आहेत. या प्रदर्शनीत नागरिकांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची ही रेलचेल राहणार आहे. त्या सोबतच आबालवृद्धापासून सर्वांसाठी विशेष भव्य फूड झोन साकार करण्यात आले आहे. नवीन व प्रभावी बी टू बी संधी, उद्योग व उद्योजकांसाठी मजबूत नेटवर्किंग प्लेटफॉर्म, ग्राहक, उत्पादनांची प्रत्यक्ष खरेदी व लाइव डेमो,तांत्रिक, मशिनरी व आधुनिक सेवाचे सहज अवलोकन, फूड कोर्ट मध्ये विभिन्न प्रकारचे स्वादिष्ट प्रकार,संपूर्ण प्रदर्शनीत १.५० लाख प्रेक्षकांची येण्याची अपेक्षा आहे.या चार दिवसीय प्रदर्शनीचा सर्व व्यापारी उद्योजक व नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन चेंबरचे अध्यक्ष निकेश गुप्ता, सचिव निरव वोरा,वरीष्ठ उपाध्यक्ष सिद्धार्थ रुहाटीया,कनिष्ठ उपाध्यक्ष निखिल अग्रवाल, कोषाध्यक्ष किशोर बाछुका, सहसचिव किरीट मंत्री,सहसंयोजक राहुल मित्तल समवेत उपसमिती सदस्य पंकज कोठारी, राजकुमार राजपाल, अमरीश पारेख, आदींनी केले आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
गुरुवार, दि. १ जानेवारी २०२५
http://epaper.citynewssuperfast.com

# 12 तासात जबरी चोरीतील 3 विधी संघर्षित बालकांच्या ताब्यातून मुद्देमाल जप्त

## अमरावती शहर पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी १ जानेवारी



**अमरावती :** पोलीस आयुक्त अमरावती शहर यांनी अमरावती शहरातील जबरी चोरीचा गुन्हा उघडकिस आणने बाबत आदेशीत केले वरून पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, गुन्हे शाखा अमरावती शहर यांचे नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन प्रमाणे कार्यवाही केली.

पो.स्टे. बडनेरा येथे दिनांक ३०/१२/२०२५ रोजी फिर्यादी शेख जाबीर शेख अब्दुल्ला वय ३६ वर्ष रा. चपराशीपुरा, अमरावती यांनी तक्रार दिली की ते बडनेरा वरून अमरावती कडे येत असतांना कोडेश्वर टी-पॉईट समोर चक्कधर प्रेटोल पंप समोर स्प्लेडंर गाडीवर चार अज्ञात इसम यांनी फिर्यादीला हात दाखवुन थांबवीले व मारहान करून जबरीने फिर्यादी चे नगदी १२,५००/- रू हिसकावुन पळुन गेले. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन बडनेरा अप.क्र.७०९/२०२५ कलम ३०९ (४), ३५२, ३ (५) भान्यासं. चा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेतील पथक हे संमातर तपास करीत असतांना गुन्हे शाखेला गुप्त बातमीदाराकडुन खात्री लायक माहिती मिळाल्यावरून महादेव खोरी परिसरातुन ०३ विधी संघर्षीत बालक यांना ताब्यात घेवुन त्यांच्या कडुन गुन्हयात वापरलेली एक मोटर सायकल व नगदी असा एकुण ४०,४७०/- रू चा मुद्देमाल जप्त करून सदरचा क्लिष्ट गुन्हा हा अवघ्या १२ तासात उच्च दर्जाच्या व्यावसायीक कौशल्याचा वापर करून गुन्हा उघडकिस आणुन विधी संघर्षीत बालक यांना पुढिल कायदेशीर कार्यवाही करीता पोलीस स्टेशन बडनेरा यांच्या ताब्यात देण्यात येत आहे.

नमुद विधी संघर्षीत बालक यांनी पोलीस आयुक्तालय हद्दी मध्ये खालील प्रमाणे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर ची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला अमरावती शहर, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त . श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे रमेश धुमाळ, शिवाजी बचाटे, सपोआ गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार- दिपक सुंदरकर, सचिन बहाळे, जहीर शेख, अतुल संभे, सुरज चव्हाण, राजीक रायलीवाले, निखील गेडाम, योगेश पवार, संदीप खंडारे, यांनी केली आहे.

# चार चाकी वाहनांची काच फोडून चोरी करणाऱ्या आंतरराज्य टोळीतील एकाला अटक

◆ पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील चार गुन्ह्यांची उकल



प्रतिनिधी १ जानेवारी

**अमरावती:** राजापेठ व सिटी कोतवाली पोलिस स्टेशन हद्दीत चार चाकी वाहनांची काच फोडून रोख रक्कम व लॅपटॉप चोरीच्या लागोपाठ चार ते पांच घटना घडल्या होत्या. यामागे टोळीचा हात असावा असा संशय होता. त्यादृष्टीने तपास करून आंतरराज्य टोळीतील एकाला पकडण्यात पोलिसांना यश आले.

पोलिस तपासात गुन्हे विशिष्ट पद्धतीने केल्याचे निदेर्शनास आले. तसेच एक विशेष टोळी सहभागी असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले. गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी पथकासह घटना स्थळांची पाहणी केली.

हा गुन्हा नंदुरबार येथील नायडु गँग टोळीतील आरोपींनी केला असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींची तांत्रिक पद्धतीने माहिती प्राप्त करुन एका आरोपीला बडनेरा रेल्वे स्टेशन परिसरात अटक केली. आरोपी कार्तीक बालु नायडु पोलिस स्टेशन नवापुर जि. नंदुरबार यास ताब्यात घेतले. आरोपीची विश्वासात चौकशी केली असता त्याने शहरातील गुन्हे त्याच्या दोन सांथीदारांसह केल्याचे सांगितले. अन्य दोन आरोपी पोलिसांना हवे आहेत.

# प्रतिबंधित चायना मांजा विक्री करणाऱ्यावर कारवाई

◆ जीवितास घातक मांजा विक्रीला पायबंद आवश्यक



प्रतिनिधी १ जानेवारी

**अमरावता:** शहरात पर्यावरणाच्या दृष्टीने प्रतिबंधीत चायना मांज्याची विक्री मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे नागरिकांच्या जिवीतास धोका उत्पन्न होत असल्याने मांजा विक्री करणाऱ्या इसमांवर कार्यवाही करण्यात येत आहे. गुन्हे शाखेने एका विरूद्ध कारवाई केली.

३० डिसेंबर रोजी गुन्हे शाखा पथक पेट्रोलींग करीत असताना पिन्टू चांदेकर नावाचा इसम त्याच्या बाकळेवाडी सिलांगण रोडवरील घरासमोर प्रतिबंधीत चायना मांजा विक्री करण्यासाठी उभा होता. त्याच्या ताब्यातुन मोनो फायटर केटीसी कंपनीच्या मांजाच्या चक्री मिळून एकूण बारा हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपी भूषण उर्फ पिन्टु चांदेकर याच्या विरुध्द राजापेठ पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता कलम आणि पर्यावरण संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ, शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कारवाई केली.

# सीसीआय कापसाच्या पैशांवर बँकांचा डल्ला? शेतकऱ्यांच्या तक्रारींनी खळबळ

प्रतिनिधी १ जानेवारी

**दर्यापूर :** सीसीआय (कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) मार्फत कापूस विक्री केलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणारी रक्कम थकीत कर्जाच्या नावाखाली थेट कर्ज खात्यात वर्ग केली जात असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. शेतकऱ्यांचे आधार कार्ड ज्या बँकेत लिंक आहे, त्या बँकांकडून परस्पर कर्जवसुली केली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांनी तक्रारींची दखल घेत मा. जिल्हाधिकारी अमरावती तसेच मा. जिल्हा व्यवस्थापक, अग्रणी बँक अमरावती यांच्याशी थेट चर्चा करून निवेदन सादर केले.

कर्जवसुली थांबवा, नाहीतर 'शिवसेना स्टाईल' उत्तर
युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांचा इशारा




कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणारी सीसीआयची रक्कम, शेतकरी अनुदान किंवा इतर कोणतेही शासकीय पैसे बँकांनी परस्पर कर्ज खात्यात वर्ग करू नयेत, अशी ठाम भूमिका यावेळी मांडण्यात आली. यानंतरही जर कोणत्याही बँकेने अशी वसुली केली, तर संबंधित बँक अधिकाऱ्याला 'शिवसेना स्टाईलने उत्तर देऊ' असा स्पष्ट इशाराही युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांनी दिला आहे. दरम्यान, शेतकऱ्यांचे पैसे कर्ज खात्यात वर्ग केल्यानंतर ते परत देण्यास बँक टाळाटाळ करत असल्यास, अशा पीडित शेतकऱ्यांनी थेट संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. संपर्क क्रमांक: ९९२१७५७१८०, ९४२१७५७१८० या प्रकारामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, प्रशासन व बँकांनी तात्काळ स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी केली जात आहे.

# राजीव गांधी गतिमानता अभियान व स्पर्धेचे आयोजन

◆ ऑनलाईन प्रस्ताव स्विकारण्यासाठी १२ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

प्रतिनिधी १ जानेवारी

**अमरावती :** 'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा' सन २०२५-२६ या स्पर्धेचे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यासाठी १२ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, असे अपर आयुक्त संजय जाधव यांनी एका पत्राव्दारे कळविले आहे.

दि. ३ फेब्रुवारी २०२१ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार या योजनेअंतर्गत घेण्यात येणाऱ्या स्पर्धेसाठी सर्व स्तरावर प्रस्ताव स्विकारण्याची मुदत ३१ ऑक्टोबर २०२५ अशी होती. तथापी विधिमंडळाचे अधिवेशन व राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका यामुळे हे प्रस्ताव सादर करण्याकरीता आता दिनांक १२ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यासंदर्भात संबंधित विभागांनी अधिनस्त सर्व कार्यालयांना आवश्यक त्या सूचना देण्याबाबत विभागीय आयुक्तालयाव्दारे कळविण्यात आले आहे. 'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा' या स्पर्धेचे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करणे.तसेच अभियान व स्पर्धेशी संबंधित सर्व अनुषंगिक बाबींवर कार्यवाही करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल विकसित करण्यात आलेले आहे. सदर पोर्टलच्या संकेतस्थळाची लिंक 'pragatiabhiyan.maharashtra.gov.in' अशी आहे, असेही विभागीय आयुक्तालयाव्दारे कळविण्यात आले आहे.

# नववर्ष प्रण - सुरक्षित अन्न विशेष तपासणी मोहीम सुरू

प्रतिनिधी १ जानेवारी

**अमरावती :** नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना स्वच्छ आणि भेसळमुक्त अन्न मिळावे, यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत जिल्ह्यात 'नववर्ष प्रण - सुरक्षित अन्न' विशेष तपासणी अभियान राबविण्यात येत आहे. हे विशेष अभियान २४ डिसेंबरपासून सुरू झाले असून १० जानेवारी २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. या मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील हॉटेल, उपहारगृहे, क्लब हाऊस आणि रिसॉर्ट्स इत्यादी आस्थापनांची कसून तपासणी केली जाणार आहे. तपासणीसोबतच संबंधित आस्थापना चालकांसाठी सुरक्षित अन्नाबाबतच्या सवयी आणि नियमांबाबत सभा व कार्यशाळा घेऊन मार्गदर्शन करण्यात येणार आहे. नागरिकांना सुरक्षित, स्वच्छ आणि भेसळमुक्त अन्न मिळावे, यासाठी सर्व अन्न व्यावसायिकांनी आवश्यक ती दक्षता घ्यावी, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन कार्यालयाने केले आहे. या मोहिमेमुळे खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेवर प्रशासनाचे विशेष लक्ष राहणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक नजर ठेवली जाणार आहे.

# सहकार व्यवस्थापन पदविकेसाठी प्रवेश सुरू

प्रतिनिधी १ जानेवारी

**अमरावती :** सहकार व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रमासाठी अमरावती येथील भाऊसाहेब भोकरे सहकार प्रशिक्षण केंद्रातर्फे दि. १ जानेवारी ते ३१ जुन २०२६ या मुदतीसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. दि. १ ते ३० जानेवारी २०२६ या दरम्यान प्रवेश देण्यात येणार आहे. सहकार विभागाने सहकारी संस्थांमध्ये काम कारणाऱ्या कर्मचाऱ्यास सहकारी व्यवस्थापन पदविका अनिवार्य केले आहे. त्यामुळे राज्यातील सहकारी संस्थामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांचे कामकाज सांभाळून हा अभ्यासक्रम दुरूस्थ शिक्षण पद्धतीने पुर्ण करता यावा, तसेच राज्यातील सुशिक्षित बेरोजगार तरूणांना सहकार क्षेत्रातील विविध सहकारी संस्थामध्ये सदर पदविका अभ्यासक्रमामुळे नोकरीची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी संघाने १३ सहकार प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून हा अभ्यासक्रम पोस्टल पद्धतीने सुरू केला आहे. प्रवेशासाठी प्राचार्य, भाऊसाहेब भोकरे सहकार प्रशिक्षण केंद्र, अमरावती यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन सहकार प्रशिक्षण केंद्राचे भाऊसाहेब भोकरे यांनी केले आहे.

# मेरा युवा भारततर्फे तालुकास्तरीय खेळ स्पर्धा

प्रतिनिधी १ जानेवारी

**अमरावती :** मेरा युवा भारत आणि नांदगाव खंडेश्वर जनस्वराज्य बहुउद्देशीय संस्था यांच्या वतीने नांदगाव खंडेश्वर येथे विविध खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी जनस्वराज्य बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष भूपेंद्र जेवडे, तालुका वकील संघ उपाध्यक्ष मोहन जाधव, शीतल काळे उपस्थित होते. यात कबड्डी, खो-खो, १०० मीटर मुलांचे धावणे, गोळाफेक, १०० मीटर मुलींची धावणे, खो-खो या स्पर्धेत विजेता संघाला प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक, तसेच वैयक्तिक खेळाडूंना प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पारितोषिक म्हणून मेरा युवा भारत अमरावती, युवा कार्यक्रम विभाग युवा कार्यक्रम एवं खेळ मंत्रालय भारत सरकार ही ट्रॉफी व प्रमाणपत्र देण्यात आले. या स्पर्धा मेरा युवा भारतच्या जिल्हा युवा अधिकारी स्नेहल बासुतकर यांच्या मार्गदर्शनाखाली भूपेंद्र जेवडे यांनी आयोजित केल्या. स्पर्धेसाठी जन स्वराज्य बहुउद्देशीय संस्थेचे पदाधिकारी आणि सदस्यांनी पुढाकार घेतला.

# एमपीएससी संयुक्त पूर्व परीक्षेचे रविवारी आयोजन

◆ १२ हजारहून अधिक उमेदवार देणार परीक्षा

प्रतिनिधी १ जानेवारी

**अमरावती :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित करण्यात आलेली महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ येत्या रविवारी, ४ जानेवारी २०२६ रोजी पार पडणार आहे. या परीक्षेसाठी प्रशासनाने तयारी केली आहे.

ही परीक्षा रविवार, दिनांक ४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ या एकाच सत्रात पार पडेल.

अमरावती शहरामध्ये परीक्षेसाठी एकूण ४१ परीक्षा उपकेंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. परीक्षेसाठी एकूण १२ हजार ८६४ उमेदवार प्रविष्ट होणार आहेत.

परीक्षेचे कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी एकूण १ हजार २५० अधिकारी आणि कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रशासनाकडून परीक्षेचे नियोजन पूर्ण झाले असून उमेदवारांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

## सिटी न्यूज सुपरफास्ट — खामगाव

# अपर्णा फुंडकर यांच्या कार्याचा आम्हाला अभिमान : प्रा. विजय पुंडे

प्रतिनिधी १ जानेवारी




**खामगाव :** नवनिर्वाचित नगराध्यक्ष अपर्णा फुंडकर यांच्या यशाचा आम्हाला अभिमान आहे असे प्रतिपादन खामगांव अर्बन बँक परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला.

सन २०२६ च्या दिनदर्शिकेचा विमोचन सोहळा आणि सत्कार समारंभ जिल्हा संघचालक बाळासाहेब काळे, संचालक मंडळ तसेच व्यवस्थापन मंडळ सदस्य यांच्या उपस्थितीत ३० रोजी मुख्य कार्यालयाचे माधव सभागृहात झाला. महाराष्ट्र प्रदेश भाजपा सोशल मिडीया सेलचे सागर फुंडकर उपस्थित होते. नगराध्यक्ष यांचा बँकेच्या वतीने संचालिका विजया राठी, फुलवंती कोरडे, कल्पना उपरवट, मनीषा माटे, सुवर्णा चोथवे व सी.ए. मीना देशमुख यांनी शाल-श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सत्कार केला. याप्रसंगी बँकेचे उपाध्यक्ष डॉ. सतिष कुळकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर जाधव, संचालक ॲड. किरण मोकासदार, डॉ. अभय मंडलिक, डॉ. अनिल धनागरे, प्रशांत देशपांडे, डॉ. राजेश मुंदडा, निरज आवंडेकर, योगेश चौबिसा, डॉ. मोहन बानोले, संदिप डोळस, विशाल मंत्री, बैंक व्यवस्थापन मंडळ समिती सदस्य घनश्यामदास छांगाणी, मोहनराव हसबनिस व कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष पराग देशमुख तसेच मोठ्या संख्येने बँकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आपले मनोगत व्यक्त करतांना नवनिर्वाचीत नगराध्यक्षा सौ. अपर्णा फुंडकर यांनी बँकेच्या सामाजीक कार्यास शुभेच्छा देत निवडणूकीतील सहकार्याबद्दल खामगांव अर्बन बँक परिवाराचे आभार मानले. तर जिल्हा संघचालक बाळासाहेब काळे यांनी दिनदर्शिका उपक्रमाची स्तुती करीत पुढील काळात दिनदर्शिका अधिकाधिक आकर्षक होण्याचे दृष्टीने मौलीक सुचना केली.आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रा. विजयजी पुंडे सांगीतले की, खामगांव अर्बन बँक सतत सामाजीक बांधिलकी जोपासत असते, येणाऱ्या काळात सुध्दा समाजोपयोगी कार्यात बैंक सहकार्य करेल. तसेच खामगांव अर्बन बँक मागील १४ वर्षापासून दरवर्षी चांगल्या दर्जाच्या दिनदर्शिका तयार करीत असून ह्या दिनदर्शिकेचे सभासद खातेदार, प्रतिष्ठाने शाळा-महाविद्यालये, विविध कार्यालय, हितचिंतकांना मोफत वाटप करीत असते. यावर्षी सुध्दा बँकेने ५०००० रेग्युलर साईज व २५००० ऑफीस साईज अशा ७५००० दिनदर्शिका तयार केल्या आहेत. बँकेच्या या सामाजीक उपक्रमास मिळत असलेल्या प्रचंड प्रतिसादामुळे आमचा उत्साह वाढत असल्याचे सांगीतले. तसेच आपल्या नियोजीत व्यस्त कार्यक्रमातून सत्कार सोहळा व दिनदर्शिका विमोचन कार्यक्रमास वेळ दिला, त्याबद्दल मान्यवरांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राजु जुनारे यांनी केले तर कार्यक्रमाचे यशस्वीतेकरीता हरिदास उज्जैनकर, सुधीर तळवेलकर, तेहरसिंग भिलाला, प्रकाश कळसकर, दिपक पिवळटकर व सर्व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# निवासी मूकबधिर विद्यालयात सक्षम द्वारे मोफत नेत्र तपासणी शिबीर

प्रतिनिधी १ जानेवारी

**खामगाव :** जागतिक दिव्यांग सशक्तीकरण दिवसानिम्मित निवासी मूकबधिर विद्यालय खामगाव येथे सक्षम द्वारे मोहनराव नारायण नेत्रालाय नांदुरा यांच्या माध्यमातून मोफत नेत्र तपासणी शिबीर झाले.

शिबिराला सक्षम प्रांत संघटन मंत्री आशुतोष देशपांडे , मूकबधिर शाळेचे प्राचार्य डॉ. जगताप तसेच सक्षम नगर सचिव अमित जोशी , उपाध्यक्ष आशिष सराफ , कोषाध्यक्ष मुन्ना कस्तुरे, सहसचिव राजेश पुरोहित, प्रसिद्धी प्रमुख रोशन जोशी, यांसह मोहनराव नेत्रालायचे विठ्ठल सोनाग्रे, नेत्र चिकित्सक डॉ. झनके, खंडारे यासह टीम उपस्थित होती.



यावेळी संचालन सक्षम महिला प्रमुख व शाळेच्या शिक्षिका भाग्यश्री मोरखडे यांनी केले या शिबिरात एकूण १०१ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली असून २५ चस्मे वितरित करण्यात येणार आहे

या शिबिरात सक्षम प्रांत संघटन मंत्री मार्गदर्शन करतांना विद्यार्थी सुद्दा आपल्या सांकेतिक भाषा द्वारे बोलू लागले येणाऱ्या २६ जनेवारी ला या चष्म्यांचे वितरण मुकबधीर शाळेत होणार आहे.

सिटी न्यूज अकोला

गुरुवार, दि. १ जानेवारी २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# आरोग्य विभागातर्फे धूम्रपानविरोधी दिनाचा उपक्रम

प्रतिनिधी १ जानेवारी

**अकोला:** सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे १ जानेवारी रोजी धूम्रपानविरोधी दिन उपक्रम राबविण्यात येईल. नवीन वर्षाच्या सुरुवातीला नागरिकांनी तंबाखूमुक्त जीवनाचा संकल्प करावा, या उद्देशाने हा दिवस प्रतीकात्मक स्वरूपात पाळला जातो. तंबाखूच्या सेवनामुळे होणाऱ्या गंभीर धोक्यांबाबत जनजागृती करणे आणि लोकांना धूम्रपान व तंबाखूचे सेवन सोडण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी उपक्रम राबविण्यात येईल. धुम्रपान किंवा तंबाखूच्या सेवनामुळे तोंड, फुफ्फुसे, घसा, अन्ननलिका, स्वादुपिंड व मूत्राशयाचा कर्करोग, हृदयविकार, स्ट्रोक, सीओपीडी, दमा, मधुमेह, दंतविकार तसेच रोगप्रतिकारशक्ती कमी होण्याचा धोका वाढतो. गर्भावस्थेत तंबाखूचे सेवन केल्यास गर्भपात, अकाली जन्म व बाळाच्या मृत्यूचा धोका वाढतो. तंबाखूमध्ये असलेले निकोटीन, टार व कार्बन मोनोऑक्साइड हे घटक शरीरातील ऑक्सिजनचा पुरवठा कमी करून पेशींना नुकसान पोहोचवतात.

# मतदार जनजागृतीच्या अनुषंगाने महानगरपालिका शाळांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन








प्रतिनिधी १ जानेवारी

**अकोला:** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अनुषंगाने अकोला महानगरपालिका क्षेत्रात मतदान जनजागृती करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनील लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे.

या अनुषंगाने अकोला महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांद्वारे मतदान जनजागृती रॅली, चित्रकला स्पर्धा आणि रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे.

शिवसेना वसाहत परिसरात मतदार जनजागृतीसाठी मनपा मराठी मुलांची शाळा क्रं. २६ च्या विद्यार्थ्यांची भव्य रॅली काढण्यात आली. त्यानंतर इयत्ता ६ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली, तसेच मनपा उर्दू शाळा क्र. ६, अकोट फाईल येथील विद्यार्थ्यांनीही मतदार जनजागृती रॅलीत सहभाग नोंदविला, तसेच मनपा मराठी मुलांची शाळा क्र. ९, काळा मारोती येथे चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. मनपा मराठी मुलांची शाळा क्र. १९, हरिहर पेठ, अकोला येथेही चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. मनपा हिंदी बालक शाळा क्र. २, अकोट फाईल येथे जनजागृती रॅली व चित्रकला स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली. मनपा मराठी मुलांची शाळा क्र. १६, आदर्श कॉलनी येथे चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.मनपा मराठी मुलांची शाळा क्रं १४ सिंधी कॅम्प तेथे रांगोळी स्पर्धा,मनपा सिंधी हिंदी बालक शाळा क्रं १ चित्र कला स्पर्धा याशिवाय इतरही अनेक शाळांमध्ये मतदार जनजागृतीविषयक विविध कार्यक्रम राबविण्यात आले आहे. काही शाळांमध्ये जनजागृती नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी हरिशचंद्र इटकर यांनी स्वतः उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व समजावून सांगितले.

## विकलांगता निर्मूलन मोहिमेचे प्रणेते मणियार यांचा सत्कार




प्रतिनिधी १ जानेवारी

**अकोला:** विकलांग व्यक्तींना आत्मनिर्भर बनविण्यासाठी आकि. 'रामेश्वर मणियार यांनी हाती घेतलेली मोहीम सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या व्यक्तीसाठी प्रेरणादायी आहे असे गौरवोद्गार विभागीय आयुक्त श्रीमती डॉ श्वेता सिंघल यांनी काढले.स्व.पंजाबराव देशमुख यांच्या १२७ व्या जयंती निमित्त पीडीएमएमसी,शिवाजी शिक्षण संस्था,रेडक्रॉस सोसायटी अकोला,आकि.'रामेश्वर मणियार व अंबादास खोब्रागडे फाउंडेशन यांच्या माध्यमातून विक्रमी ११११ जयपूर फूट वितरणाचे लक्ष गाठल्याबद्दल विकलांगता निर्मूलन मोहिमेचे प्रणेते मणियार यांचा अमरावतीच्या विभागीय आयुक्त श्रीमती डॉ श्वेता सिंघल यांनी अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयात सत्कार केला.

## गृह उद्योग मेळाव्यात अनेक उद्योजकांचा सन्मान




**अकोला:** स्थानीय अग्रसेन भवनात अकोला अग्रवाल समाज वेल्फेअर ग्रुपच्या वतीने आयोजित दोन दिवसीय गृह उद्योग व रोजगार मेळाव्यात अनेक महिला पुरुष उद्योजक व सेवेकऱ्यांचा सन्मान करण्यात आला.या मेळाव्याचा प्रारंभ भाया ग्रुपचे अध्यक्ष डॉ मनोज अग्रवाल यांच्या हस्ते व ज्येष्ठ उद्योजक रमाकांत खेतान, श्रीमती पुष्पादेवी अग्रवाल, निशा लोहिया आदींच्या उपस्थितीत करण्यात आला. प्रास्ताविक अग्रवाल वेल्फेअरचे बजरंगलाल अग्रवाल यांनी करून वेलफेअर ग्रुपच्या सामाजिक सेवेची माहिती दिली. तर राजू अग्रवाल यांनी या रोजगार मेळाव्याची माहिती दिली. या गृह उद्योग व रोजगार मेळाव्यात जळगाव, इंदोर, नागपूर ,शेगाव ,परतवाडा, चांदूरबाजार येथील ६५ पेक्षा जास्त महिला पुरुष उद्योजक सहभागी झाले होते. या मेळाव्याच्या द्वितीय दिनी विविध मान्यवर व महिला पुरुष उद्योजकांच्या सन्मानाने मोठ्या थाटात समारोप करण्यात आला.

## सुलभाताई दुतोंडे नगराध्यक्ष आज पदभार स्वीकारणार

प्रतिनिधी १ जानेवारी



**हिवरखेड:** नवनिर्वाचित नगराध्यक्ष सुलभा दुतोंडे नववर्षाच्या पहिल्या दिवशी १ जानेवारी रोजी पदभार स्वीकारणार आहेत. त्यांची राजकीय कारकीर्द आश्चर्यचकित करणारी आहे. सामान्य कुटुंबातील सौ. सुलभाताई कार्य कर्तृत्वाच्या जोरावर हिवरखेडच्या पहिल्या नगराध्यक्ष म्हणून प्रचंड मतांनी निवडून आल्या आहेत.

पराभव कशाला म्हणतात हे त्यांना माहितच नाही. २०१० साली त्या हिवरखेड ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून आल्या. २०१४ मध्ये त्या पुन्हा सदस्य झाल्या. २०१९ मध्ये त्या हिवरखेड सर्कल मधून जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आल्या व हिवरखेड ग्रामपंचायतचे रूपांतर नगर परिषदे मध्ये झाल्यानंतर त्या आता नगराध्यक्ष म्हणून निवडून आल्या. एकप्रकारे विजयाचा चौकार मारत त्या आतापर्यंत अपराजित ठरल्या आहेत. त्यांचे पती रमेशभाऊ दुतोंडे हे सुद्धा हिवरखेडचे उपसरपंच, पंचायत समिती सदस्य व ग्रामपंचायत सदस्य राहिलेले आहेत. पती-पत्नी आतापर्यंत नऊ निवडणुका जिंकले आहे.

याला कारण म्हणजे या जोडप्याने स्वतःला जनसेवेला वाहून घेतले आहे. लोकांच्या सेवेसाठी उपलब्ध राहणे, लोकांच्या लहानमोठ्या समस्या सोडवणे, गरीब श्रीमंत भेद न करणे, पक्षभेद विसरून सर्वांची कामे करणे, कुणाच्याही अडीअडचणीत धावून जाणे, कुणाच्याही धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक कार्याला सढळ हाताने मदत करणे हे त्यांच्या राजकीय यशाचे गमक आहे. शिवाय राजकारणाच्या सारीपाटावरच्या अचूक गोट्या बसवण्याचे कौशल्य रमेशभाऊला अवगत आहे.

आमदार प्रकाशभाऊ भारसाकळे यांचे मानसपुत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रमेशभाऊंनी आमदार प्रकाशभाऊ भारसाकळे, आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, अनिल गावंडे यांच्यासह भारतीय जनता पक्षाचा विश्वास संपादन केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तर हिवरखेड नगर परिषदेच्या येथील प्रचारसभेत बोलतांना पक्षनिष्ठा शिकावी ती रमेश दुतोंडे यांच्याकडून या शब्दात त्यांचा गौरव केला. राजकारणात सतत यश मिळवूनही रमेशभाऊ व सुलभाताईचे पाय जमिनीवरच आहेत. मी ची बाधा त्यांना शिवली नाही. साधे राहणे, बोलणे व दिलेला शब्द पाळणे हे रमेशभाऊ व सुलभाताईचे वैशिष्ट्य!

## कडाक्याच्या थंडीत प्रवाशांचे हाल



प्रतिनिधी १ जानेवारी

**हिवरखेड:** कडाडत्या थंडीमुळे जनजीवन प्रभावित झाले आहे. रात्रीच्या वेळी बसस्थानक परिसरात थंडी मध्ये प्रवासी बसची वाट पाहत असतात. बस येईपर्यंत त्यांना कुडकुडत बसल्याशिवाय पर्याय नाही. अंग चोरून बसलेले प्रवासी पाहायला मिळतात. ज्यांनी स्वेटर घातले नाही. ज्यांच्या जवळ शाल नाही त्यांचे अतिशय हाल होत आहेत. थंडी पासून बचावासाठी प्रवासी तसेच नागरिकांनी काळजी घ्यावी कारण आणखी काही दिवस थंडी राहणार आहे. स्थानिक प्रशासनाने देखील या बाबतीत आवाहन केले आहे.

## आकोलखेड येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त कार्यक्रम

प्रतिनिधी १ जानेवारी



**अकोट:** आकोलखेड येथील क्षत्रिय माळी समाज पंच मंडळ अकोलखेड व सर्व समाज बांधवांच्या अथक प्रयत्नाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्सव व ज्ञानज्योती दिनदर्शिका प्रकाशन सोहळा शनिवार ३ जानेवारी रोजी आयोजित करण्यात येत आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष अमोल निमकर क्षत्रिय माळी समाज पंच मंडळ अध्यक्ष, विशेष उपस्थिती महेश गणगणे, किशोर जुनघरे पो. निरीक्षक आकोट, मिलिंद झाडे, गजानन डाफे संचालक ,पवन बेलसरे पत्रकार या कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती रितेश भोरखडे उपसरपंच ग्रामपंचायत अकोलखेड, महिला विशेष उपस्थिती मीनाक्षी काटोले पोलीस उपनिरीक्षक अकोट ग्रामीण, सौ पल्लवी गणगणे संस्थापक अध्यक्ष सावित्री लेकी ग्रुप, शुभांगी गणोरकार अध्यक्ष, वैशाली फुलारी उपाध्यक्ष, शनिवार दि.३ जानेवारी वेळ सायंकाळी ६.३० वाजता ठरला असून स्थळ क्षत्रिय माळी समाज भवन आकोलखेड या सावित्रीबाई फुले जयंती उत्सव कार्यक्रमाचे आयोजन क्षत्रिय माळी पंचमंडळ व सर्व समाज महिला व पुरुष बांधव आकोलखेड सावित्रीच्या लेखी ग्रुप महिला या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे तरी सर्व समाज बांधवांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावावी.

## नववर्ष स्वागताला सूर्य, चंद्र, पृथ्वी जवळ

प्रतिनिधी १ जानेवारी

**अकोला :** पृथ्वीभोवती चंद्र आणि सूर्याभोवती पृथ्वी फिरतांना यांच्या कक्षा काहीशा लंबवर्तुळाकार असल्याने यांच्यातील अंतर कमी अधिक होत असते.चंद्र महिन्यात एकदा तर सूर्य वर्षातून एकदा पृथ्वीच्या जवळ येतात, यावेळी मात्र हे दोघे एकाच दिवशी जवळ येण्याचा योग आला आहे.या अनोख्या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन विश्वभारती केंद्राचे प्रमुख प्रभाकर दोड यांनी केले आहे.

३ जानेवारीला ही अनोखी खगोलीय घटना घडणार असुन या दिवशी चंद्र पृथ्वीपासून केवळ ३,६२,३०० कि.मी.जवळ आल्याने आकाशात सुपरमून बघता येईल.यावेळी चंद्र सुमारे सरासरी अंतराच्या सुमारे बाविस हजार कि.मी जवळ येईल, तेव्हा चंद्र १४ज्ञ् आकाराने मोठा आणि ३०ज्ञ् अधिक प्रकाशमान दिसेल.अशी स्थिती या पुढे २४ नोव्हेंबरला राहील.तर सूर्य सुमारे २५ लाख कि.मी.म्हणजे १४ कोटी ७१ लाख अंतरावर असेल.

चंद्र महिन्यातून एकदा तर सूर्य वर्षातून एकदाच पृथ्वी जवळ येत असतात.सध्या सूर्य दक्षिण गोलार्धाकडे झुकलेला असल्याने त्या भागात उन्हाळा व आपल्या भागात हिवाळा सुरू आहे.

सध्या सूर्य धनू राशीत आणि चंद्र मिथुन राशीत असल्याने चंद्र आणि गुरु ग्रह रात्रभर एकमेकांच्या जवळ पाहता येतील. याच रात्री भूतप तारका समूहातून उल्का वर्षाव बघता येईल.







सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला शहरात उपलब्ध आहे

परळीकर न्यूजपेपर एजन्सी — डाबकी रोड 9766005335

अरुण गुजर बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9423429605

येळणे बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9028947634

वाडेकर बुक स्टॉल — जुने बस स्टँड 9921940878

यश न्यूज पॉईंट — मलकापूर 9075012816

मेडोना युनुसेट सलून — बाराज्योर्तिलींग रोड, अकोला 7507340789

पेंटर पाठक एजन्सी — महानगर पालिका मागे, अकोला 8605844453

जाहिरातीसाठी संपर्क 9209956616

बातम्यासाठी संपर्क 9075012801

# 'काम कागदावर, पैसा खिशात?' ग्रामविकास अधिकाऱ्यावर गंभीर आरोप

प्रतिनिधी १ जानेवारी

### चौकशी न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा




**कुटासा:** ग्रामविकासाच्या नावाखाली सरकारी निधीचा सर्रास गैरवापर होत असल्याचे धक्कादायक आरोप अकोट तालुक्यातील रेल ग्रामपंचायतीतील सदस्यांनी केले आहेत. ग्रामपंचायत सदस्यांना विश्वासात न घेता कामांचे रेकॉर्ड दाखवले जात नाहीत, प्रत्यक्षात न झालेली कामे कागदोपत्री दाखवून पैसे लाटले जातात, असा गंभीर आरोप ग्रामविकास अधिकाऱ्यावर करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, संबंधित ग्रामविकास अधिकारी उघडपणे सांगतात की, 'मी ठेकेदारी करतो, सदस्य–सरपंच आणि गटविकास अधिकाऱ्यांना टक्केवारी देतो, त्यामुळे सर्व कामे माझीच राहतात. 'एवढेच नव्हे तर' माझं कोणी काहीच वाकडं करू शकत नाही' अशी उद्धट भाषा वापरून सदस्यांना धमकावले जात असल्याचा आरोप आहे. आमिष दाखवून 'तुम्हीही कमाई करा, काहीही अडचण नाही' असे सांगितल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

सदस्यांनी ग्रामपंचायतीच्या बँक खात्यांची, सर्व रेकॉर्डची आणि संबंधित ग्रामविकास अधिकाऱ्याची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणात निलंबनाची कारवाई व्हावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात ०३ नोव्हेंबर २०२५ रोजी तक्रार देण्यात आली, तर २३ डिसेंबर २०२५ रोजी स्मरणपत्रही सादर करण्यात आले. मात्र आज पर्यंत कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने संताप वाढला आहे. कारवाई न झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांच्या दालनासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा सदस्यांनी दिला आहे. ग्रामविकासात पारदर्शकता कुठे आहे, असा थेट सवाल आता प्रशासनाला विचारला जात आहे.

## तयारी नरनाळा महोत्सवाची; दरपत्रके मागवली

**अकोला:** जिल्हा प्रशासनातर्फे अकोट वन्यजीव विभागाच्या सहकार्याने दि. ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान नरनाळा निसर्गपर्यटन व सांस्कृतिक महोत्सवाची पूर्वतयारी सुरू असून, विविध कार्यक्रमांच्या आयोजनासाठी सेवा पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात आली आहेत.

त्यानुसार विविध कार्यक्रमांसाठी ३ दिवस सलग स्टेज, ४० बाय ६० फूट (एलईडी स्टेज), ५०० व्यक्तींसाठी बसण्याची व्यवस्था असलेला मंडप, अनुषंगिक साहित्यासह प्रदर्शनासाठी दालने, प्रकाशयोजना, ध्वनीक्षेपण यंत्रणा, जनरेटर, निवासी तंबू (लहान व मोठे), संपूर्ण महोत्सवादरम्यान स्वच्छतेची व्यवस्था करणे आदी कामे होणे आवश्यक आहे. इच्छूक पुरवठादारांनी दि. ६ जानेवारी २०२६ पर्यंत पाकिटबंद दरपत्रक उपविभागीय अधिकारी कार्यालय, अकोट येथे कार्यालयीन वेळेत सादर करावे. हे दरपत्रक दि. ८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता उपविभागीय अधिकारी कार्यालय, अकोट येथे उघडण्यात येतील.




**तेल्हारा:** तेल्हारा नगर परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष यांना सिटी न्यूज सुपरफास्ट ची दिनदर्शिका भेट देण्यात आली.

## ठाणेदारांना सिटी न्यूज सुपरफास्टचे कॅलेंडर भेट

**हिवरखेड:** पोलिस स्टेशनमध्ये ठाणेदार गजानन राठोड यांना दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट कॅलेंडर भेट देण्यात आले. यावेळी पोलिस स्टेशनचे सर्व कर्मचारी, डॉ. राम तिडके व सिटी न्यूजचे हिवरखेड प्रतिनिधी अर्जुन खिरोडकार उपस्थित होते.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. ०१ जानेवारी २०२६

# अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवुन पळवले

प्रतिनिधी ०१ जानेवारी

**कळंब** : कळंब तालुक्यातील देवखळा (पहुर) येथील एका अल्पवयीन मुलीला घरातून पळवून नेल्याची धक्कादायक घटना 29 डिसेंबर रोजी घडली.

पोलिसांच्या तपासानुसार आरोपी सुरज शेडमाके (वय 24, रा. मुरली, ता. घाटंजी) या प्रकरणी ताब्यात आले आहेत. मुलगी त्या वेळी शाळेत शिकत होती आणि तिच्या सुरक्षिततेसाठी तातडीने कारवाई करण्यात आली आहे. मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीनुसार आरोपीने सोशल मीडिया व मोबाइलवर संपर्क साधून मुलीला फसवले आणि घरातून पळवून नेले. घटनास्थळी पोलीसांनी त्वरीत हजर राहून तपास सुरू केला. पोलिस उपनिरीक्षक प्रमोद काळे यांनी सांगितले की, आरोपीविरोधात अपहरणासंबंधी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरु आहे.

# शिंदे सेनेला सत्तेपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न; यवतमाळ शहर विकास आघाडी स्थापन

## भाजप, प्रहार, बसपा व अपक्ष नगरसेवकांचा सहभाग

प्रतिनिधी ०१ जानेवारी

**यवतमाळ** : यवतमाळ नगरपरिषदेच्या निवडणुकीत भाजपाला बहुमत आणि नगराध्यक्षपद मिळाल्यानंतरही पक्षाने प्रहार, बसपा आणि अपक्ष नगरसेवकांसह 'यवतमाळ शहर विकास आघाडी' स्थापन केली आहे. या आघाडीचे नेतृत्व गट नेता नितीन गिरी करत असून, जिल्हा प्रशासनास आघाडीबाबत अधिकृत पत्र दिले गेले आहे. भाजपाकडून शिंदे सेनेला सत्तेपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. सोमवारी भाजपाच्या जिल्हा कार्यालयात आघाडीची अधिकृत नोंदणी झाली. यावेळी जिल्हा अध्यक्ष एड. प्रफुल्ल चव्हाण, नगराध्यक्ष एड. प्रियदर्शनी उईके, महामंत्री राजू पडगीलवार, नगरसेवक योगेश पाटिल, शंतनू शेटे, रेखा कोठेकर आणि भाजपाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. नगरपरिषदेत भाजपाचे 28 नगरसेवक आहेत, प्रहारचे 2, बसपा 1 आणि अपक्ष नगरसेवक भारत ब्राह्मणकर यांचा सहभाग असून आघाडीची संख्या 33 झाली आहे. विरोधकांमध्ये काँग्रेसचे 15, शिवसेना शिंदे गट 7, वंचित बहुजन आघाडी 3 आणि एमआयएमचा 1 नगरसेवक आहे. नगराध्यक्ष भाजपाचा असल्यामुळे कोणत्याही महत्त्वाच्या प्रस्तावावर भाजपाला स्पष्ट बहुमत मिळेल. नगरपरिषदेत पहिली सभा २ जानेवारी 2026 रोजी होण्याची शक्यता आहे. या सभेत उपाध्यक्ष आणि स्वीकृत सदस्यांची निवड केली जाणार आहे. भाजपाच्या 5 स्वीकृत सदस्यांपैकी 3 निवडण्यासाठी एकूण 6 दावेदार मैदानात आहेत. या निवडीसाठी पक्षाच्या स्थानिक आणि जिल्हास्तरीय चर्चा सुरू आहेत. आघाडी स्थापन करण्याचा निर्णय विरोधी पक्षांसोबत समन्वय साधून घेतला गेला आहे, ज्यामुळे निर्णय अधिक सबळ आणि दीर्घकालीन ठरला आहे. अपक्ष नगरसेवक भारत ब्राह्मणकर, जो पूर्वी भाजपाचा सक्रिय पदाधिकारी होता, त्याच्या सहभागामुळे आघाडी अधिक मजबुतीची झाली आहे. निवडणुकीनंतर भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात सहकार्याची चर्चा होती, परंतु स्थानिक स्तरावर सहमती न मिळाल्यामुळे भाजपा स्वतंत्रपणे आघाडी स्थापन करत नगरपरिषदेत बहुमत मिळवू शकली. गटनेतेपदी भाजपाचे नितीन गिरी निवडले गेले, तर वंचित बहुजन आघाडीचे गटनेतेपदी जिल्हाध्यक्ष व नगरसेवक डॉ. निरज वाघमारे यांची निवड झाली आहे. अद्याप काँग्रेस आणि शिंदे सेनेने गटनेत्याची नियुक्ती केली नाही, त्यामुळे आगामी निर्णयांवर सर्वांचे लक्ष लागले आहे. भाजपाचे नेते आणि कार्यकर्ते यवतमाळ शहर विकासासाठी वेगवान निर्णय घेण्यास सज्ज असून नागरिकांची नजर आता पहिल्या सभेवर लागली आहे. या सभेत उपाध्यक्ष निवड आणि स्वीकृत सदस्यांची घोषणा केली जाणार आहे.

**2 जानेवारीला पहिली सभा**

# मुख्याध्यापकाला लाच घेतांना रंगेहात पकडले

## वैद्यकीय बिलासाठी १,५०० रुपयांची लाच

प्रतिनिधी ०१ जानेवारी

**यवतमाळ** : शासकीय सेवेत पारदर्शकतेचे बडेजाव मिरवले जात असतानाच यवतमाळ जिल्ह्यातील एका शासकीय आश्रमशाळेतून लाचखोरीचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. वैद्यकीय प्रतिपूर्तीचे बिल लवकर खात्यात जमा करून देण्यासाठी १,५०० रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी खैरखेडा (ता. पुसद) येथील शासकीय माध्यमिक आश्रम शाळेचे मुख्याध्यापक गौरिशंकर प्रभाकर सैदाणे (वय ४४) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे. या कारवाईमुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

याप्रकरणी तक्रारदार हे पदवीधर प्राथमिक शिक्षक असून तेच शासकीय माध्यमिक आश्रम शाळा, खैरखेडा येथे कार्यरत आहेत. तक्रारदारांचे वैद्यकीय उपचारांबाबतचे प्रतिपूर्ती देयक मा. अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, अमरावती यांनी मंजूर केले होते. मात्र मंजुरीनंतरही रक्कम खात्यात जमा होत नसल्याने त्यांनी मुख्याध्यापक सैदाणे यांच्याकडे पाठपुरावा केला असता, "लवकर पैसे हवे असतील तर १,५०० रुपये द्यावे लागतील," अशी स्पष्ट लाच मागणी करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला.

या तक्रारीची गंभीर दखल घेत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ यांनी २२ डिसेंबर २०२५ रोजी पडताळणी कार्यवाही केली. या दरम्यान आरोपी मुख्याध्यापकाने तक्रारदाराकडून वैद्यकीय देयक मंजूर करून खात्यात जमा करून देण्यासाठी १,५०० रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर एसीबी पथकाने तत्काळ सापळा रचत आरोपीला ताब्यात घेतले. पुढील कायदेशीर कारवाईसाठी खंडाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही संपूर्ण कारवाई बापू बांगर, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तसेच सचींद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अमरावती, पोलीस उपअधीक्षक जगदिश



परदेशी (एसीबी वाशिम) आणि पोलीस उपअधीक्षक अभय आष्टेकर (एसीबी यवतमाळ) यांनीही या कारवाईवर देखरेख केली. प्रत्यक्ष कारवाईत पोलीस निरीक्षक अल्का गायकवाड (एसीबी वाशिम), पोलीस निरीक्षक मनोज ओरके (एसीबी यवतमाळ) यांच्यासह पोहवा योगेश खोटे, चापोशी मंगेश देवकते, पोहवा अतुल मत्ते, अब्दुल वसीम, सुधीर कांबळे, पोना सचिन भोयर, राकेश सावसाकडे, पोशि भागवत पाटील, सुरज मेश्राम तसेच चालक पोना अतुल नागमोते यांचा समावेश होता. दरम्यान, कोणत्याही शासकीय लोकसेवकाने लाच मागितल्यास नागरिकांनी न घाबरता अँन्टी करप्शन ब्युरो यवतमाळ कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस उपअधीक्षक, एसीबी यवतमाळ यांनी केले आहे. यासाठी दूरध्वनी क्रमांक ०७२३२-२४४००२, मोबाईल क्रमांक ८९७५७९१०६४ किंवा टोल फ्री क्रमांक १०६४ उपलब्ध आहे.

# घरकुलांचे अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होणार

प्रतिनिधी ०१ जानेवारी

**महागाव** : महागाव शहरातील प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांसाठी दिलासादायक घडामोड असून, गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेले घरकुलांचे थकीत अनुदान येत्या दोन दिवसांत थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. नगरपंचायतीला यासाठी २ कोटी ८५ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाल्याची माहिती नगराध्यक्षा सुनंदा दिलीपराव कोपरकर यांनी दिली. सन २०१७-१८ पासून महागाव नगरपंचायत क्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजना राबविण्यात येत आहे. या योजनेसाठी शहरात तीन सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) मंजूर करण्यात आले असून, पहिल्या डीपीआरमध्ये २७५, दुसऱ्या डीपीआरमध्ये ४०१ आणि तिसऱ्या डीपीआरमध्ये १८० असे एकूण ८५६ लाभार्थी निवडण्यात आले आहेत. मात्र, शासनाकडून निधी वेळेवर उपलब्ध न झाल्याने अनेक लाभार्थ्यांची घरे अपूर्ण अवस्थेत राहिली होती. नगरपंचायतीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांनी याबाबत सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला. हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खासदार नागेश पाटील यांनी मुंबई येथील म्हाडा कार्यालयात प्रत्यक्ष भेट देऊन तसेच पत्रव्यवहार करून निधी मिळविण्यासाठी पुढाकार घेतला. या प्रयत्नांना यश येत अखेर महागाव नगरपंचायतीला २ कोटी ८५ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. नगराध्यक्षा कोपरकर यांनी सांगितले की, ज्या लाभार्थ्यांनी आपली घरे पूर्ण केली आहेत, अशा साडेतीनशेहून अधिक लाभार्थ्यांना प्राधान्याने अनुदान दिले जाणार आहे. निधीचे वाटप शासनाच्या नियमांनुसार आणि समान पद्धतीने करण्यात येईल. कोणताही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही, अशी ग्वाही सत्ताधारी गटाने दिली आहे. सध्या मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली लाभार्थ्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्याची तांत्रिक प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. दरम्यान, घरकुल किंवा रमाई आवास योजनेच्या नावाखाली कोणीही पैशांची मागणी केल्यास तात्काळ लोकप्रतिनिधी, मुख्याधिकारी किंवा जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याचे आवाहन उपनगराध्यक्ष प्रमोद भरवाडे यांनी केले आहे. तसेच नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले. सत्ताधारी गटनेते शैलेश कोपरकर यांनी, योजनेत भ्रष्टाचार झाल्याच्या आरोपांचे खंडन करत, नगरपंचायतीकडे आजवर भ्रष्टाचाराबाबत एकही तक्रार प्राप्त झालेली नसल्याचे सांगितले. प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घेणाऱ्या नागरिकांनी नगरपंचायतीची थकीत करवसुली नियमित करून सहकार्य करावे, असे आवाहन नगरसेवक महेश गजानन पाटील यांनी केले आहे.

# पायल कांबळे यांचा नागरी सत्कार उद्या

प्रतिनिधी ०१ जानेवारी

**घाटंजी** : नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीच्या विजयी उमेदवार पायल संघपाल कांबळे ह्या मागील ३० वर्षांचा राजकीय इतिहास मोडीत काढत उघड प्रवर्गातून बहुमत्ताधिक्याने विजयी झाल्या. या अभूतपूर्व लोकजागृतीच्या विजयाचा सन्मान म्हणून नवं वर्षाच्या पर्वावर, दिनांक २ जानेवारी २०२६, शुक्रवार संध्याकाळी ७ वाजता, तिवसाळा ग्रामवासियांच्या वतीने जाहीर नागरी सत्कार आयोजित करण्यात आला आहे. "हा फक्त विजय नाही".. तर हा बांधलेल्या मनोऱ्यांपेक्षा मोठा विश्वास आहे. सर्व नागरीकांनी कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# उमरखेड तहसीलवर तलाठ्यांचे धरणे आंदोलन

प्रतिनिधी ०१ जानेवारी

**उमरखेड** : ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) संवर्गाच्या प्रलंबित आर्थिक व सेवाविषयक मागण्यांकडे प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ विदर्भ पटवारी संघ, नागपूर जिल्हा शाखा यवतमाळच्या वतीने उमरखेड उपविभागात एकदिवसीय लक्षवेधी धरणे आंदोलन करण्यात आले. ३१ डिसेंबर रोजी उमरखेड तहसील कार्यालयासमोर हे आंदोलन पार पडले असून, तालुक्यातील तलाठी संवर्गाने शंभर टक्के उपस्थिती लावत आपली ताकद दाखवून दिली. जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकारी संवर्गाने विविध मागण्यांसाठी यापूर्वी अनेक वेळा जिल्हा प्रशासनाकडे निवेदने सादर केली होती. मात्र त्याची कोणतीही दखल घेतली जात नसल्याने अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले. आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात उमरखेड तहसील कार्यालयात तलाठ्यांनी आपले डीएससी टोकन जमा केले आणि त्यानंतर तहसील कार्यालयासमोर शांततेत लक्षवेधी धरणे दिले. तलाठी संवर्गाच्या प्रमुख मागण्यांमध्ये गेल्या १५ वर्षांपासून प्रलंबित असलेली एकत्रित सेवाज्येष्ठता यादी तातडीने अद्ययावत करणे, तलाठी संवर्गाला मंडळ अधिकारी पदोन्नती संवर्गात समाविष्ट करणे, विनंतीनुसार बदली प्रक्रिया पूर्ण करणे, कालबाह्य झालेले लॅपटॉप व प्रिंटर बदलून देणे, अतिवृष्टी व दुष्काळ अनुदान वाटपावरील नियमानुसार ०.२५ टक्के प्रशासकीय खर्चाचा मेहनताना देणे, भाड्याने असलेल्या तलाठी कार्यालयांना नियमित भाडे अदा करणे, वार्षिक मूल्यांकन अहवालाची प्रत उपलब्ध करून देणे, वेतन निश्चिती वेळेवर करणे, सहा महिन्यांपेक्षा जास्त अतिरिक्त प्रभार न देता त्याचा मेहनताना देणे, आदिवासी प्रोत्साहनपर भत्ता मंजूर करणे, ग्राम महसूल कार्यालयांना



फर्निचर व मूलभूत सुविधा पुरवणे आदी मागण्यांचा समावेश आहे. यासोबतच गौण खनिज पथकासाठी संरक्षण देणे, ग्राम महसूल कार्यालयांचे वीजबिल शासनामार्फत भरणे, वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके तातडीने निकाली काढणे, २०१३ शीर्षकांतर्गत मिळणारी रक्कम ग्राम महसूल अधिकाऱ्यांना प्रदान करणे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील तलाठी स्थापनेचा नियमित आढावा घेण्याचीही मागणी करण्यात आली आहे. हे आंदोलन विदर्भ पटवारी संघ नागपूर केंद्रीय अध्यक्ष बाळकृष्ण गाढवे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हाध्यक्ष भरत पिसे यांच्या नेतृत्वात पार पडले. यावेळी उमरखेड उपविभागीय अध्यक्ष राजकुमार गरुडे, जिल्हा कोषाध्यक्ष प्रकाश कानडे, उपविभागीय कोषाध्यक्ष गणेश मोळके, मंडळ अधिकारी गजानन सुरोशे, तलाठी प्रकाश हापसे यांच्यासह तालुक्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी उपस्थित होते. नायब तहसीलदार राम पंडित यांच्याकडे मागण्यांचे निवेदन देण्यात आले. दरम्यान, २ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार असून, त्यानंतरही मागण्यांची पूर्तता न झाल्यास ६ जानेवारीपासून जिल्ह्यातील तलाठी संवर्ग बेमुदत सामूहिक रजेवर जाणार असल्याचा इशारा केंद्रीय अध्यक्ष बाळकृष्ण गाढवे यांनी दिला आहे.

# दोन हजार ४७ गावे दुष्काळाच्या छायेत

प्रतिनिधी ०१ जानेवारी

**यवतमाळ** : यंदाच्या खरिप हंगामात अतिवृष्टी व महापुराने शेतीसह पिके उद्ध्वस्त झाली. दरम्यान बुधवारी जिल्हा प्रशासनाने खरिप पिकांची अंतिम पैसेवारी जाहीर केली. यामध्ये जिल्ह्यातील दोन हजार ४७ गावे दुष्काळाच्या छायेत असून जिल्ह्याची अंतिम पैसेवारी ४७ पैसे निघाली आहे. त्यामुळे जिल्हा दुष्काळाच्या छायेत असल्याचे शिक्कामोर्तब झाले आहे. आता शासनाकडून दुष्काळ लागू कधी केला जातो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ७८ नुसार प्रत्येक गावातील कोरडवाहू खरीप व रब्बी पिकांची पैसेवारी काढली जाते. सप्टेंबरमध्ये काढलेल्या नजरअंदाज पैसेवारीत जिल्ह्यातील दोन हजार ४७ गावांतील पीक परिस्थिती चांगली असल्याचे दाखविण्यात आले होते. तर ३१ ऑक्टोबरला जिल्हा प्रशासनाने सुधारित आणेवारी जारी केली. त्यात नजरअंदाजच्या स्थितीत बदल झाला होता. सुधारित पैसेवारी ४८ जाहीर झाल्याने दुष्काळावर शिक्कामोर्तब झाला होता. शासनाने यापूर्वी जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर केला. त्यामुळे दुष्काळी निकष लागू झालेले आहेत. असे असताना बुधवारी प्रशासनाने अंतीम पैसेवारी ४७ असल्याचे घोषित केले आहे. आता दुष्काळावर आणखी भर पडणार आहे. सध्याच्या परिस्थितीत सोयाबीन पूर्णपणे, तर कापूस फार चांगल्यास्थितीत दिसत नाही. तुरीवर शेतकऱ्यांची आशा आहे. परंतु रोगराई वाढल्यामुळे शेतकरी पुन्हा संकटात सापडला आहे.

# आकोली ग्रामपंचायतीत निधीचा चुराडा; सचिवांच्या तात्काळ बदलीची मागणी

प्रतिनिधी ०१ जानेवारी

**उमरखेड** : तालुक्यातील आकोली ग्रामपंचायतीत पंधरावा वित्त आयोग तसेच इतर शासकीय निधीच्या वापरावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, ग्रामपंचायत सचिव अडकीणे मॅडम यांच्या कार्यपद्धतीविरोधात नागरिकांनी थेट आरोप केले आहेत.

सरपंच व काही सदस्यांच्या सांगण्यावरून निधीचा मनमानी व गैरवापर करण्यात आल्याचा आरोप करत नागरिकांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती उमरखेड यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, पंधराव्या वित्त आयोगातून प्राप्त निधीचा चुराडा करण्यात आला असून, अनेक व्यक्तींच्या नावावर खोटी बिले दाखवण्यात आली आहेत. प्रत्यक्षात मात्र संबंधित कामे झाल्याचे कुठेही दिसून येत नसल्याचा दावा नागरिकांनी केला आहे. यामुळे ग्रामपंचायतीतील विकासकामांवर संशय व्यक्त केला जात आहे. तक्रारीत असेही नमूद करण्यात आले आहे की, ग्रामपंचायत सचिव महिन्यातून केवळ एकदाच ग्रामपंचायतीत उपस्थित राहतात. नियमित ग्रामसभा न घेता केवळ कागदोपत्री कोरम पूर्ण असल्याचे दाखवून बनावट ग्रामसभा झाल्याची नोंद केली जात असल्याचा आरोप आहे. परिणामी, गावकऱ्यांना शासकीय योजना व लाभांची माहिती मिळत नसून अनेक नागरिक विविध योजनांपासून वंचित राहत आहेत. माहिती अधिकार कायद्यान्वये मागविण्यात आलेल्या माहितीतूनही अनेक बाबी संशयास्पद असल्याचे समोर आले असल्याचा दावा नागरिकांनी केला आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र समिती नेमून सखोल चौकशी करावी आणि दोषी आढळल्यास संबंधितांवर कडक कारवाई करावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे. तसेच ग्रामपंचायत सचिवांची तात्काळ बदली करण्याची मागणीही तक्रारीत करण्यात आली आहे. आकोली ग्रामपंचायतीतील हा कथित प्रकार ग्रामीण प्रशासनातील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा ठरत असून, गटविकास अधिकारी या प्रकरणात काय भूमिका घेतात, याकडे संपूर्ण उमरखेड तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर वार्डाचा विकास करू

## अॅड. संतोष जैन यांचे प्रतिपादन; सम्यक बुद्ध विहारात स्वागत

प्रतिनिधी ०१ जानेवारी

**उमरखेड**: डॉ. बाबासाहेब आंबेडकर वार्डातील रखडलेला सार्वजनिक विकास येत्या काळात पूर्ण करण्यात येईल, असे ठाम प्रतिपादन उमरखेड नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा तेजश्री जैन यांचे प्रतिनिधी अॅड. संतोष जैन यांनी केले. शहरातील चळवळीचे केंद्र मानल्या जाणाऱ्या सम्यक बुद्ध विहार येथे आयोजित स्वागत समारंभात ते बोलत होते. उमरखेड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत बहुमत मिळविणाऱ्या जनशक्ती पॅनलच्या वतीने नवनिर्वाचित नगराध्यक्षा तेजश्री जैन, प्रभाग क्रमांक ११ चे नवनिर्वाचित नगरसेवक गजानन रासकर व नगरसेविका वैष्णवी सागर लाहेवार यांचा वार्डातील नागरिकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव साहेबराव कांबळे यांच्यासह



विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. मार्गदर्शन करताना अॅड. संतोष जैन यांनी, वार्डातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, सामाजिक व मूलभूत सुविधांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्यात येईल, असे सांगितले. "डॉ. बाबासाहेब आंबेडकर वार्डाचा विकास हा आमचा राजकीय नव्हे तर सामाजिक संकल्प आहे. नागरिकांच्या विश्वासाला पात्र ठरेल असे काम केले जाईल," असेही त्यांनी नमूद केले. यावेळी साहेबराव कांबळे यांनीही नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींना सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी नगरपरिषदेत प्रभावीपणे आवाज उठविण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार सिद्धार्थ दिवेकर यांनी केले, तर आभार तुषार पाईकराव यांनी मानले. रमा माता महिला मंडळ, सम्यक बुद्ध विहार समिती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर वार्डाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# गोदावरी अर्बनला राष्ट्रीय स्तरावरील "बँकिंग एक्सलन्स अवॉर्ड"

प्रतिनिधी ०१ जानेवारी

**यवतमाळ** : गोदावरी अर्बनने आपल्या कार्यक्षेतातील पाचही राज्यात लघु व मध्यम उद्योग (MSME) क्षेत्राच्या विकासासाठी दिलेल्या उत्कृष्ट योगदानाबद्दल 'बेस्ट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी म्हणून "बँकिंग एक्सलन्स अवॉर्ड २०२५' या प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले.

चेंबर ऑफ इंडियन मायक्रो,स्मॉल अँण्ड मिडियम एंटरप्रायझेस (CIMSME) यांच्या वतीने आयोजित भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पियुष गोयल, केंद्रीय लघू व मध्यम उद्योग मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव व विकास आयुक्त डॉ. राजनेश, तसेच CIMSME चे अध्यक्ष सी.ए. मुकेश मोहन गुप्ता यांच्या शुभहस्ते गोदावरी




अर्बनचे उप सरव्यवस्थापक रवि इंगळे व वरिष्ठ व्यवस्थापक महेश केंद्रे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

लघू व मध्यम उद्योजकांना आर्थिक सक्षमतेकडे नेण्यासाठी गोदावरी अर्बनने दिलेले भक्कम कर्जपुरवठा, सुलभ बँकिंग सेवा, पारदर्शक व्यवहार व विश्वासार्ह व्यवस्थापन यामुळे संस्थेचे कार्य राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय ठरले आहे.

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या उभारणीस व विस्तारास दिलेल्या मोलाच्या योगदानाची दखल घेतच हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे. या यशाबद्दल गोदावरी अर्बनचे संस्थापक नामदार हेमंत पाटील, अध्यक्ष राजश्री पाटील यांनी व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांच्यासह समस्त संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी वृंद, सभासद व ठेवीदारांचे अभिनंदन केले. गोदावरी अर्बनने सहकार क्षेत्रात केलेल्या सातत्यपूर्ण कार्यामुळे व सूक्ष्म,लघु व मध्यम उद्योगांसाठी राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे संस्थेची राष्ट्रीय स्तरावर विश्वासार्ह ओळख निर्माण होत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

# तिन वर्षीय चिमुकलीचा विनयभंग

प्रतिनिधी ०१ जानेवारी

**कळंब** : घरात एकटी असलेल्या तीन वर्षीय चिमुकलीचा विनयभंग केल्याची घटना शहरात २९ डिसेंबर दुपारी सुमारे २.३० वाजताच्या सुमारास घडली.

मारोती नेहारे (वय ५५, रा. माथावस्ती) असे आरोपीचे नाव आहे. आरोपीने चिमुकलीला चॉकलेट देण्याचे बहाणे करून घरात नेले व कपडे काढण्याचा प्रयत्न केला. शेजारील महिला साक्षीदार असल्याने तिने आईला फोन करून घटना कळवली. चिमुकली बाहेर पडली व आईला संपूर्ण घटनाक्रम सांगितला. चिमुकलीच्या आईच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध POCSO कलमान्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू करण्यात आला आहे. पोलीस प्रशासनाने त्वरित कारवाई केली असून पुढील प्रक्रिया सुरू आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. सतत घडत असणा-या घटनेने मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## जाहिरनामा

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते, अर्जदार-संतोष रामा राठोड रा सेनंद ता महागांव जि. यवतमाळ यांनी त्यांचे मुला करीता जितेश संतोष राठोड जन्म/ सचिव ग्रा.पचायत टेभुरदरा ता. महागांव येथे दि 26/05/2001 रोजी झाला आहे.

परंतु त्यांच्या जन्म नोंद, सचिव. ग्रा.पचायत टेभुरदरा /नगरपंचायत, महागांच येथे नसल्यामुळे महाराष्ट्र जन्म / नोंदणी अधिनियम कलम 13 (3) /नगरपंचायत, महागांव यांना जन्म नोंद घेण्याबाबत प्रकरण या कार्यालयास सादर कले आहे.

तरी हितसंबंधित व्यक्तीचे उपरोक्त जाहीरनामाबाबत कोणाचा काही आक्षेप असल्यास दिनांक 15/01/2026 रोजी पर्यंत आपले आक्षेप लेखी स्वरुपात कार्यालयीन वेळेत या कार्यालयात 15 दिवसाच्या आत सादर करावेत. मुदती नंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

**स्वाक्षरी**
**तहसिल कार्यालय महागाव**
**तहसीलदार**

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
गुरूवार दि.१ जानेवारी २०२६

# पोखरातील घोटाळ्याची धमाल, अनुदान लाटण्याची कमाल...

# योजनेच्या निकषांवर हल्ला, नियमबाह्य अनुदानावर मारला डल्ला !

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात ' पोखरा ' योजनेत लाखों नव्हे; तर करोडो रुपयांचा घोटाळा झाला असल्याचे संकेत मिळत आहेत. रिसोड तालुक्यातील या योजनेच्या घोटाळ्याची रहस्यमयी कहाणी संपता संपेना. आता पुन्हा नवा ट्विस्ट या निमित्ताने पुढे येत आहे.योजनेच्या निकषांवर हल्ला करत काही शातीरांनी योजनेचे नियम व निकष वेशीवर टांगून लाखों रुपयांच्या नियमबाह्य अनुदानावर डल्ला मारला असल्याची चर्चा जिल्हाभर होत आहे. एकाच कुटुंबातील अनेक सदस्यांच्या नावावर बोगस देयके जोडून शासनाची दिशाभूल केली असल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. यात प्रामुख्याने योजनेचे सर्व निकष डावलून सिंचन विहीर, ठिंबक व तुषार सिंचन साहित्य,बियाणे, शेडनेट, पाईप आदी वैयक्तिक लाभाचे घटक तर अवजारे बँक, धान्य सुकवणी शेड आणि ट्रॅक्टर व त्यासंबंधी कृषीयंत्र आदी समुह घटकांच्या लाभांचा समावेश असल्याचे बोलले जात आहे. या गंभीर भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करून दोषींवर तातडीची कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे योजनेतील समाविष्ट गावातील वंचित शेतकरी तक्रारी दाखल करण्यात येणार असल्याची माहिती समोर येत आहे. परिणामी चौकशीअंती लवकरच ' पोखरा ' घोटाळ्याचा भांडाफोड होईल अशी शक्यता वर्तवली जात आहे.





## रिसोड तालुक्यात खळबळ...

प्राप्त माहितीनुसार रिसोड तालुक्यात सन २०१८ ते २०२४ या कालावधीत जवळपास १८ गावात 'पोखरा भाग- १' योजना राबविण्यात आली होती. या योजनेअंतर्गत समाविष्ट असलेल्या गावातील शेतकऱ्यांना शेती सबंधित विविध योजना उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. आर्थिकदृष्ट्या डबघाईस आलेल्या शेतकऱ्यांना उत्पन्न वाढीसाठी आधुनिक तंत्राची नितांत गरज आहे. हे सरकारच्या लक्षात आल्याने या योजनेसाठी करोडो रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जात आहे. परंतु संनियंत्रण करणाऱ्या कृषी विभागाने या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची योग्य रितीने जनजागृती न केल्यामुळे जवळपास प्रत्येक गावातील ८० टक्के शेतकरी या योजनेपासून अनभिज्ञ राहिले आहेत.

तर कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांशी लागेबांधे असलेल्या काही शातीरांनी या योजनेचे सर्व निकष डावलून नियमबाह्य लाखों रुपयांचे अनुदान लाटले आहे. सबंधित विभागाशी अर्थपूर्ण संबंध प्रस्थापित करून काहींनी एकाच कुटुंबात अनेक सदस्यांच्या नावावर वेगवेगळ्या घटकांची बोगस देयके जोडून डबल डबल लाभ घेतला असल्याची विश्वसनीय माहिती हाती आली आहे. ही शातीर मंडळी एवढ्यावरच थांबली नाही, तर नाममात्र शेतकरी समुह गट तयार करून सदर गटाच्या नावावर सुद्धा शासनाचे लाखों रुपयांचे अनुदान हडप केले असल्याची खळबळजनक माहिती पुढे येत आहे. ही गंभीर बाब योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांच्या आता लक्षात आल्याने रिसोड तालुक्यात मोठा विद्रोह उभा राहणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. तथापि याबाबत जसजशा तक्रारी दाखल होतील तसतशी बोगस अनुदान लाटणारांची नावे लवकरच चव्हाट्यावर येणार असल्याचे बोलले जात आहे.

## विहिरी बाबत नियम काय सांगतो...

पतीच्या नावावर जुनी विहीर असताना, त्याच गट नंबरमध्ये पत्नीच्या नावे पोखरा योजनेअंतर्गत नवीन विहीर घेणे ही शासनाची शुद्ध फसवणूक केल्याचे ठरते. आणि हा कायद्याने गंभीर गुन्हा ठरतो. असे करणाऱ्यांवर शासनाची दिशाभूल केल्याप्रकरणी कोणीही तक्रार दाखल करू शकते. याबाबत योग्य कागदपत्रांचे पुरावे जोडल्यास शासकीय योजनेचा गैरवापर केल्याबद्दल सबंधित अधिकारी आणि लाभार्थी दोघेही कठोर शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतात. फसवणूक सिद्ध झाल्यास, लाटलेले अनुदान व्याजासह वसूल केले जाते. फसवणूक करणाऱ्या व्यक्तीवर फसवणुकीचा गुन्हा दाखल होतो. ज्यामध्ये दंड किंवा तुरुंगवास सुद्धा होऊ शकतो. आणि दोषी आढळलेल्या व्यक्तीला भविष्यात अशा प्रकारच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेण्यापासून प्रतिबंध करण्यात येतो. जेणेकरून कुठल्याही योजनेत वारंवार असे प्रकार घडणार नाहीत.व भविष्यातील योजनांची अंमलबजावणी अधिक पारदर्शक होईल. त्यासाठी सुज्ञ नागरिकांनी तक्रार करणे अपेक्षित असून तसे झाल्यास लवकरच घोटाळेबाजांचे पितळ उघडे पडणार..!




## थोडक्यात

### ५ जानेवारी रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या शासन परिपत्रक क्र. प्रसुधा २०११/प्रक्र.१८९/११/१८-अ दिनांक २६ सप्टेंबर २०१२ तसेच महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या शासन निर्णय क्र. मलोदि-२०१३/प्र.क्र.११/मकक दिनांक ०४ मार्च २०१३ नुसार दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्या अनुषंगाने जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, दिनांक ०५ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी, वाशिम यांच्या कार्यालयातील वाकाटक सभागृहात करण्यात येणार आहे.या लोकशाही दिनामध्ये सामान्य नागरिकांनी त्यांच्या तक्रारी/निवेदने (तालुका, जिल्हा अथवा महानगरपालिका लोकशाही दिनामध्ये यापूर्वी सादर केलेल्या प्रकरणांनंतर) विहीत नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह लोकशाही दिनाच्या किमान १५ दिवस आधी दोन प्रतींमध्ये सादर करणे आवश्यक आहे. या माध्यमातून नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत व प्रभावी निराकरण व्हावे, यासाठी सर्वसामान्य नागरिकांनी या जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

### पुसद नाका उड्डाणपूल सर्व्हिस रोड बांधकामाच्या नियोजनाची जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष पाहणी

**वाशीम :** वाशिम शहरातील पुसद नाका परिसरात उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजुस असलेल्या सर्व्हिस रोडच्या बांधकामाच्या नियोजनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन पाहणी केली. या पाहणीदरम्यान कामांचे नियोजन, दर्जा तसेच वाहतूक व्यवस्थेवर होणारा परिणाम याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.

## ऊर्जा संवर्धन ही काळाची गरज, सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यावा -योगेश कुंभेजकर

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

पर्यावरण संरक्षणासोबतच शाश्वत विकासासाठी सौर ऊर्जेचा वापर वाढविणे ही आजच्या काळाची अत्यंत गरज असून सौर ऊर्जेच्या वापरावर भर द्यावा असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताहानिमित्त नियोजन भवन येथे आयोजित ऊर्जा बचत – काळाची गरज, ऊर्जा संवर्धनाचे महत्त्व व सध्याची शासकीय धोरणे या विषयावरील कार्यशाळेत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. कार्यशाळेला निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत, कृषी उपसंचालक हिना शेख, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी प्रफुल्ल खंडारे, महाऊर्जा जिल्हा व्यवस्थापक विजय काळे, ऊर्जा व्यवस्थापन परीक्षक अच्युत मेहेंदळे तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. पुढे बोलतांना जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर यांनी सांगितले की, अनेक शासकीय कार्यालयांना वाढत्या वीज देयकांमुळे आर्थिक अडचणींचा सामना करावा



लागतो. शासकीय इमारतींवर सौर ऊर्जेचा वापर केल्यास वीजबिलात मोठी बचत होऊन ऊर्जा आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करता येईल. ऊर्जेची बचत ही केवळ गरज नसून जबाबदारी आहे. दैनंदिन जीवनात छोटे-छोटे उपाय अवलंबल्यास मोठ्या प्रमाणात ऊर्जा संवर्धन साध्य होऊ शकते. भविष्यात विजेची मागणी वाढणार असल्याने आजपासूनच ऊर्जा बचतीची सवय लावणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. नागरिकांनी सौर व हरित ऊर्जेचा स्वीकार करून हरित व उज्ज्वल भविष्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.निवासी उपजिल्हाधिकारी श्री. घुगे यांनी सांगितले की, प्रदूषणमुक्त ऊर्जा मिळविणे ही काळाची गरज आहे. ग्लोबल वॉर्मिंगच्या समस्येला तोंड देण्यासाठी ग्रीन एनर्जीचा वापर वाढवावा लागेल. लहान उपाययोजनांतूनही प्रभावी ऊर्जा संवर्धन शक्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.ऊर्जा व्यवस्थापन परीक्षक श्री. मेहेंदळे यांनी वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण आणि वाढत्या ऊर्जा गरजांमुळे पारंपरिक ऊर्जास्त्रोतांवर ताण वाढत असल्याचे सांगितले. या पार्श्वभूमीवर सौर ऊर्जा हा स्वच्छ, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक पर्याय असून कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी तो अत्यंत उपयुक्त ठरेल, असे त्यांनी नमूद केले. ऊर्जा बचतीचा वसा जपण्याचे आवाहनही त्यांनी केले.यावेळी विजय काळे यांनी महाऊर्जेच्या विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. कार्यशाळेच्या शेवटी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ऊर्जा बचतीची प्रतिज्ञा घेतली.

## देहदान-अवयवदानातून मानवतेचा दीप प्रज्वलित

### शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात देहदान जनजागृती कार्यक्रम

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

देहदान व अवयवदान हे केवळ वैद्यकीय क्षेत्रासाठी उपयुक्त नसून ते समाजातील मानवतेचे सर्वोच्च प्रतीक आहे. एका व्यक्तीचा देह अनेक रुग्णांना नवे जीवन देऊ शकतो आणि वैद्यकीय शिक्षणाला दिशा देऊ शकतो. प्रत्येक नागरिकाने या चळवळीत सहभागी होऊन सामाजिक बांधिलकी जपावी. असे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित देहदान जनजागृती कार्यक्रमात केले. या कार्यक्रमाला



वाशिम नगरपालीकेचे नगराध्यक्ष अनिल केंदळे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सतीन मेश्राम, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पूरी, डॉ. नयना सारडा, शिक्षणाधिकारी मंगला धूपे, डॉ. धरमसिंग पवार, गजानन हरणे, रविदास विनकरे, प्रा. राजेश घुगे, तसेच धर्मगुरू प्रज्ञापाल भंते , पंकजदेव महाराज, जनार्दन मगर, हरिदास बनसोड, सामाजिक कार्यकर्ते अविनाश मारशेटवार आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## जलसंधारणातून जलसुरक्षिततेकडे ठोस पावले उचलावीत -जिल्हाधिकारी

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

जलसंधारण कामांचे नियोजन अधिक शास्त्रीय, वास्तवदर्शी आणि दीर्घकालीन परिणाम देणारे असणे आवश्यक आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० आणि जलयुक्त शिवार अंतर्गत राबविण्यात येणारी कामे केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात परिणामकारक ठरली पाहिजेत. नाला खोलीकरणास प्राधान्य देऊन पूरस्थितीवर नियंत्रण, पाणी साठवण क्षमता वाढ आणि भूजल पुनर्भरण साध्य करणे ही आजची गरज आहे.

प्रत्येक मंजूर कामाची वेळेत पूर्तता, गुणवत्तेची खात्री आणि जिओ टॅगींगद्वारे पारदर्शक अंमलबजावणी झाली पाहिजे. जलसंधारण ही




जिल्ह्याच्या पाणी-सुरक्षेसाठी केलेली गुंतवणूक असून त्यातून शेतकऱ्यांना स्थैर्य मिळण्याकरिता जलसंधारणातून जलसुरक्षिततेकडे ठोस पावले उचलावीत असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या जलसंधारण कामांचा सविस्तर आढावा जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. यावेळी जिल्हा जलसंधारण अधिकारी श्याम फेरवानी आणि सहाय्यक जिल्हा जलसंधारण अधिकारी अपूर्वा नानोटकर , लघुपाटबंधारे विभाग बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता हेमंतकुमार चव्हाण, लघुसिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता रजत बिजवे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० अंतर्गत बाब बदल झालेली (scope / बाब बदल) कामे २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पूर्ण होतील, याची लेखी हमी संबंधित यंत्रणांकडून घेऊन सदर कामांना मंजुरी देण्यात आली.

कामे वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पूर्ण होणे अत्यावश्यक असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी निर्देश दिले. जलसंधारण विभागाच्या आराखड्याबाबत शासनाकडून लेखी मार्गदर्शन मागवावे, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. जलसंधारणाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शाश्वत पाणीपुरवठा, दुष्काळी परिस्थितीवर मात आणि पर्यावरणपूरक विकास साधण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे.

### नवनिर्वाचित नगराध्यक्ष अशोकभाऊ परळीकर यांच्या वाढदिवसानिमित्त...

## आज विविध कार्यक्रम, धार्मिक व सामाजिक उपक्रम !

• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

मंगरुळपीर नगरपरिषदेत नुकत्याच झालेल्या निवडणुकीत विजयी झालेल्या आणि नवनियुक्त नगराध्यक्ष अशोकभाऊ परळीकर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमाचे धार्मिक व सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांचा अभिष्टचिंतन सोहळा दि. १ जानेवारी २०२६ रोजी धूमधडाक्यात पार पडणार असून भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन महात्मा फुले चौक बायपास रोड मंगरूळपीर येथील करण्यात आले आहे. तर वाढदिवसानिमित्त बिरबलनाथ महाराज यांच्या मंदिरात सकाळी ९ वाजता महाआरतीचे आयोजनही करण्यात आले आहे.

अभिष्टचिंतना सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री सुभाषराव ठाकरे, प्रमुख उपस्थितीत पालकमंत्री दत्तात्रय भरणे, खासदार संजय देशमुख हे उपस्थित राहाणार आहेत. नवनिर्वाचित नगराध्यक्ष अशोकभाऊ परळीकर , अनिल केंदळे, ॲड. सौ. मोहीनीताई इंद्रनिल नाईक यांचा सत्कार करण्यात येणार आहे. प्रमुख उपस्थितीत राज्यमंत्री इंद्रनिल नाईक, आ. भावना गवळी, आ. सईताई डहाके, आ. किरण सरनाईक, आ. वसंत खंडेलवाल, आ. महंत बाबुसिंग महाराज, रा.काँ. चे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत ठाकरे, शिवसेना जिल्हा प्रमुख सुरेश मापारी, शिवसेनेचे जिल्हा समन्वयक डॉ. सिध्दार्थ देवळे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला अध्यक्षा सोनालीताई ठाकुर, माजी नगराध्यक्ष चंदुभाऊ परळीकर, बिरबलनाथ संस्थानचे सचिव राजकुवर रघुवंशी, राष्ट्रवादी काँग्रेसचे वाहीद शेख हे राहणार आहे.



धार्मिक व सामाजिक चळवळींचा समन्वय साधून नविन वर्षाच्या पहिल्या दिवशीच असा उत्साहवर्धक कार्यक्रम आयोजित करण्याच्या उद्देशाने, मंगरुळपीरमधील सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय वातावरणात सकारात्मक व उत्साहवर्धक संकेत मिळतात. स्थानिक नेत्यांना व कार्यकर्त्यांना एक चपखल व्यासपीठ उपलब्ध करून देणे,धार्मिक-सांस्कृतिक स्तरावर एकात्मता सुधारणे,नव्याने निवडलेल्या नेत्यांना जनआशीर्वाद व सत्कार देणे,नववर्षाच्या पहिल्या दिवसापासून सकारात्मक संदेश देणे.सदर कार्यक्रम यशस्वी झाल्यास, नव्या नगरपरिषद नेतृत्वाच्या कार्यप्रदर्शनाची सुरुवात उत्साहपूर्ण व आशादायक ठरेल, अशी स्थानिक वर्तुळात चर्चा दिसून येते.

## डॉ.विजय काळे संमेलनात निमंत्रित कवी !

### अ. भा. मराठी साहित्य संमेलनात सहभागी होण्याचा बहुमान

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

**नवीन वर्षारंभाच्या पर्वावर सातारा येथे होत असलेल्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात येथील युवा कवी तथा अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विजय काळे विदर्भाचे प्रतिनिधीत्व करणार आहेत. डॉ. काळे निमंत्रितांच्या कविसंमेलनात आपली कविता सादर करणार आहेत.**

वाशीम येथील सशक्त युवा कवी डॉ. विजय दामोदर काळे यांची निमंत्रितांच्या कविसंमेलनामध्ये वर्णी लागली आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आजपर्यंतच्या इतिहासात याआधी वाशीम जिल्ह्यातून पद्मश्री नामदेव कांबळे आणि बाबाराव मुसळे या दोन थोर साहित्यिकांनाच आतापर्यंत निमंत्रण मिळालेले आहे. त्यांच्यानंतर निमंत्रित म्हणून डॉ. विजय काळे हे जिल्ह्यातील तिसरेच साहित्यिक ठरले आहेत. कविसंमेलनात सहभागी होण्यासाठी ते आज वाशीमहून रवाना झाले. शुक्रवार, दि. दोन जानेवारीला उद्घाटन सत्र आटोपल्यानंतर, दुपारी तीन वाजता होणाऱ्या निमंत्रितांच्या कविसंमेलनात डॉ. विजय काळे हे आपली कविता सादर करतील.



व्यवसायाने अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी असलेल्या डॉ. विजय काळे यांनी आतापर्यंत अनेक कविसंमेलने गाजविलेली आहेत. साधे शब्द आणि काळजाला भिडणारा अर्थ हे त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे. कवितेचे प्रभावी सादरीकरण करण्यात त्यांचा हातखंडा आहे. वऱ्हाडच्या मातीतील संवेदनशील कवी असलेल्या डॉ. विजय काळे यांच्या कवितांना देशी धार आहे. त्यातील वक्रोक्ती आणि व्यंग, तिरकसपणा रसिकांना भावतो. कारूण्य आणि वास्तव या धाग्यांनी विणलेली काळे यांची कविता एक अस्वस्थ सत्य सांगते आणि रसिकांना व्याकूळ करते. अशा दमदार कवीला साताऱ्याचे निमंत्रण मिळाल्याने वाशीमच्या वर्तुळात आनंदाचे वातावरण आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
गुरुवार, दि. १ जानेवारी २०२५ http://epaper.citynewssuperfast.com

# अकोला महापालिका निवडणूक 719 उमेदवार रिंगणात

प्रतिनिधी १ जानेवारी

**अकोला :** महापालिकेच्या २० प्रभागांतील ८० जागांसाठी दाखल झालेल्या ७७७ पैकी ५८ अर्ज छाननीत बाद झाले. असून, आता ७१९ उमेदवार रिंगणात आहेत. शुक्रवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर लढतीचे खरे चित्र स्पष्ट होणार आहे.

महापालिका निवडणुकीसाठी मंगळवारपर्यंत दाखल अर्जाची बुधवारी छाननी झाली. त्यामध्ये प्रभाग पाच 'ब' जागेवर उमेदवारी दाखल केलेले शिंदेसेनेचे उमेदवार विजय वानखडे यांचा अर्ज

### ◆ अर्ज माघारीनंतर लढतीचे चित्र होणार स्पष्ट

जातवैधता प्रस्ताव दाखल केल्याची पावती नसल्याने रद्द झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. शरद जावळे यांनी दिली. त्यांच्याकडे जबाबदारी असलेल्या ३, ४, ५ व ६ क्रमांकाच्या प्रभागातील एकूण तीन उमेदवारांचे अर्ज बाद ठरले आहेत.

प्रभाग क्रमांक १४ 'अ' या जागेसाठी अर्ज केलेल्या काँग्रेसच्या उमेदवार कोकिळा वानखडे आणि शिंदेसेनेच्या मोनल रमेश दुर्गे या दोन महिला उमेदवारांचे अर्जही बाद झाले.

झोन पाचचे निवडणूक निर्णय अधिकारी विजय पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, १० उमेदवारांचे अर्ज बाद झाल्याने त्यांची उमेदवारी रद्द झाली, तर उमेदवारांनी अतिरिक्त दाखल केलेले २० अर्ज बाद झाले आहेत.

### शिंदेसेनेच्या २, उद्धवसेना, काँग्रेसच्या प्रत्येकी एक अर्ज बाद

◆ महापालिका निवडणूक लढण्यासाठी उमेदवारी दाखल केलेल्या शिंदेसेनेच्या दोन, तर काँग्रेस आणि उद्धवसेनेच्या प्रत्येकी एका उमेदवाराचा अर्ज बुधवारी छाननीत बाद झाला. उद्धवसेनेच्या उमेदवाराला कंत्राटदार असणे भोवले, तर इतरांना विविध कारणांसाठी निवडणुकीचे मैदान सोडावे लागले.

झोन क्रमांक सहामधील प्रभाग क्रमांक १६, ११ व २० मधील एकही अर्ज बाद झाला नाही. या तीनही प्रभागांत ८० उमेदवार निवडणूक मैदानात आहेत. झोन क्रमांक एकमधील प्रभाग क्रमांक १, २ व ७ मधून पाच अर्ज बाद झाले आहेत. या प्रभागांत १३१ उमेदवार रिंगणात आहेत. झोन क्रमांक चारमध्ये सर्वाधिक म्हणजे आठ उमेदवारांचे अर्ज विविध कारणांनी बाद झाले आहेत, असे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. संतोष देवलीकर यांनी सांगितले.

# मनपा आयुक्तांची परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यां सोबत आचार संहिता संदर्भात बैठक

प्रतिनिधी १ जानेवारी

### ◆ महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक



**अकोला :** अनुषंगाने आदर्श आचार संहिता सुरू आहे. निवडणुकीच्या काळात होणारे गैरप्रकार थांबविण्याच्या दृष्टीने तसेच आदर्श आचार संहितेच्या प्रभावी अंमल बजावणीसाठी आज दि. ३० डिसेंबर २०२५ रोजी मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ.सुनिल लहाने यांच्याव्दारे त्यांच्या दालनात उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिका-यांसोबत बैठक संपन्न झाली.

याबैठकीत मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ.लहाने यांनी, उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या वतीने आचार संहितेच्या कडक अंमल बजावणीसाठी करण्यात येणा-या कार्याबद्दल माहिती घेतली. तसेच उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या शहरात आदर्श आचार संहितेच्या प्रभावी अंमल बजावणीसाठी ३ भरारी पथके कार्यान्वीत करण्यात आले आहे. तसेच नागरिकांना तक्रार करण्यासाठी ०७२४-२९५७०७० नंबर कार्यान्वीत आहे.

तसेच यावेळी मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ.लहाने यांनी लहान ४ व्हीलर लाईट व्हेकल आमच्या आचार संहिता पथकाव्दारे तपासण्यात येत असून मोठे हेव्ही लोड व्हेकल हे उपप्रादेशिक परिवहन विभागाव्दारे तपासण्यात यावे, तसेच आदर्श आचार संहितेच्या प्रभावी अंमल बजावणी साठी मनपाच्या पथकासोबत समन्वय करून कार्य करणे सुचना दिल्या. तसेच मनपा आचार संहिता कक्षांतर्गत असलेल्या ७ चेक पोस्टवर हेवी व्हेकल तपासणी केल्यास आचार संहितेचे काटेकोरपणे अंमल बजावणी करता येईल असे मनपा आयुक्त यांनी मत व्यक्त केले. तसेच यावेळी शहरामध्ये रस्त्यालगत पडलेल्या बेवासर असलेली जुनी वाहने जप्तीची स्वतंत्र संयुक्त कार्यवाही करण्याकरिता निवडणुकी नंतर करण्यात येईल असे ठरले. यावेळी मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, उपप्रादेशिक परिवहन विभागाचे मो.वा.नि. क्षितिज व्यवहारे, स.मो.वा.नि.चैत्राली इंगळे, साहेबराव कात्रे, आचार संहिता कक्ष प्रमुख सादिक ग.अली, मनपा उपायुक्त विजय पारतवार, दिलीप जाधव, निवडणूक विभाग प्रमुख अनिल बिडवे, जनसंपर्क अधिकारी भरत शर्मा आदींची उपस्थिती होती.

# काँग्रेसमधील अंतर्गत कटकारस्थानामुळे अकोट नगराध्यक्ष निवडणुकीत पराभव

### हिदायत पटेल यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची अलका बोडखे यांची मागणी

प्रतिनिधी १ जानेवारी

**अकोट :** अकोट नगर परिषद निवडणूक २०२५ मध्ये काँग्रेस पक्षाच्या अधिकृत नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. अलका संजय बोडखे यांचा पराभव हा पक्षांतर्गत कटकारस्थानामुळे झाल्याचा गंभीर आरोप करत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष हिदायत पटेल यांच्यावर तात्काळ शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

दि. १३ नोव्हेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने नगराध्यक्ष पदासाठी आपली अधिकृत उमेदवारी जाहीर केल्यानंतर हिदायत पटेल यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली होती. पक्षाने उमेदवारी कायम ठेवली असतानाही त्यांनी पाच ते सहा दिवस त्रास देत केवळ औपचारिक पाठिंबा दर्शविल्याचा आरोप सौ. बोडखे यांनी केला आहे. नगरसेवक पदाच्या एकूण ३५ उमेदवारांपैकी केवळ ७ जागांवरच पक्षनिष्ठ उमेदवार देण्यात आल्याचा आरोप करत, आपल्या समाजाचे अकोट शहरात ७५०० पेक्षा अधिक मतदार असतानाही एकाही जागेवर प्रतिनिधित्व मिळू दिले नसल्याचे त्यांनी नमूद केले. उलट भाजपाने त्याच समाजातील नगराध्यक्ष पदासह पाच नगरसेवक उमेदवार दिल्याने काँग्रेसचे मोठे नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व प्रहार संघटना काँग्रेससोबत आघाडी करण्यास तयार असतानाही हिदायत पटेल यांनी जाणीवपूर्वक आघाडी टाळल्याने २ ते ३ हजार मतांचे नुकसान झाल्याचेही निवेदनात नमूद आहे. तसेच प्रभाग क्रमांक १, २, ३, ६, ७ व ९ मध्ये मुद्दाम कमकुवत उमेदवार देऊन काँग्रेसचा दारुण पराभव घडवून आणल्याचा आरोप करण्यात आला आहे. मुस्लीम बहुल प्रभागांमध्ये काँग्रेसच्या १५ उमेदवारांनंतरही केवळ सुमारे ३ हजार मते मिळाल्याने हा ऐतिहासिक अपयश असल्याचे सांगत, ही मते जाणीवपूर्वक एमआयएमकडे वळविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच सहकार गटाच्या माध्यमातून भाजपाला अप्रत्यक्ष मदत करून त्यांच्या मतांमध्ये वाढ केल्याचा ठाम आरोपही करण्यात आला आहे. सन २००४ च्या विधानसभा निवडणुकीतही हिदायत पटेल यांनी काँग्रेसच्या अधिकृत उमेदवाराविरोधात अपक्ष म्हणून निवडणूक लढवून पक्षविरोधी भूमिका घेतल्याची आठवण करून देत, अशा कारवायांमुळे अनेक नेते पक्ष सोडून गेल्याचा दावा करण्यात आला आहे. या सर्व बाबी लक्षात घेता आगामी महापालिका व जिल्हा परिषद निवडणुकांमध्येही काँग्रेसचे नुकसान होऊ नये म्हणून हिदायत पटेल यांना तात्काळ पक्षातून निलंबित करावे व काँग्रेस समर्थकांना न्याय द्यावा, अशी ठाम मागणी सौ. अलका बोडखे यांनी काँग्रेसच्या राष्ट्रीय व प्रदेश नेतृत्वाकडे केली आहे.

# एकलारा बानोदा येथे बिबट्याच्या हल्ल्यात पाच बकऱ्या ठार



प्रतिनिधी १ जानेवारी


**खामगाव :** संग्रामपूर तालुक्यातील एकलारा बानोद परिसरात वावर बिबट्याचा दिवसेंदिवस धोकादायक ठरत असून, काकणवाडा (बु) येथे बुधवारी बिबट्याच्या हल्ल्यात पाच बकऱ्या ठार झाल्याची घटना उघडकीस आली. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संग्रामपूर तालुक्यातील काकणवाडा (बु) येथील शेतकरी गजानन देवराव हिप्परकर यांच्या गोठ्यातील बकऱ्यांवर बिबट्याने हल्ला केला.ज्या मध्ये पाच बकऱ्या ठार झाल्या,घटनेची माहिती मिळताच वनरक्षक एस.एस. सावळे, अमोल शेगोकार व जी.एस. साकळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला, तसेच परिसरात बिबट्याच्या हालचाली टिपण्यासाठी कॅमेरे लावण्यात आले आहेत.

### तातडीने बंदोबस्ताची मागणी

◆परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करण्यात यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे, तसेच रात्रीच्या वेळी वन विभागाने गस्त वाढवावी, अशीही मागणी होत आहे.

# भक्तिगीते आणि भजनांच्या तालावर भक्तांनी केले नववर्षाचे स्वागत

### ◆ शहरात ठिकठिकाणी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन



प्रतिनिधी १ जानेवारी

**अकोला :** नवीन वर्ष सर्वांच्या जीवनात सुख-शांती घेऊन येवो आणि सर्वांचे जीवन आरोग्यदायी व चिंतामुक्त राहो, याच मनोकामनांसह अकोल्यातील भाविकांनी भक्तिगीते आणि भजनांच्या तालावर डोलत नववर्षाचे जल्लोषात स्वागत केले.

यंदा पौष शुक्ल पक्षातील एकादशी, गुरुवार आणि नूतन वर्ष असा 'त्रिवेणी संगम' जुळून आल्याने अकोल्याचे आराध्य दैवत श्री राजराजेश्वर महाराज, रामदेव बाबा आणि श्याम बाबा यांच्या मंदिरांमध्ये दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. आपल्या लाडक्या देवाचे दर्शन घेण्यासाठी रात्री उशिरापर्यंत भक्तांचा ओघ सुरू होता.

गतवर्षाला निरोप आणि नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी भाविकांनी भक्तिसंगीत, जम्मा जागरण, श्याम संकीर्तन, हनुमान चालीसा पठण आणि सुंदरकांड यांसारख्या विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

शहरातील काही सामाजिक संघटनांनी या निमित्ताने वृक्षारोपण, अन्नदान आणि रक्तदान यांसारख्या कार्यक्रमांचे आयोजन करून समाजासमोर एक आदर्श ठेवला.

संत-महात्मा आणि धार्मिक संस्थांनी या सोहळ्यांच्या माध्यमातून तरुण पिढीला व्यसनांपासून दूर राहण्याचा, वाईट संगत सोडण्याचा आणि सत्कर्माने सन्मार्गावर चालण्याचा संदेश दिला. आध्यात्मिकतेची कास धरत, जीवनात सकारात्मक बदल घडवण्याचा आणि ईश्वराच्या चरणी लीन होण्याचा संकल्प करून अकोलेकरांनी हे नवीन वर्ष साजरे केले.



# दहीहांडा ठाण्यातील पोलीस नाईकावर एसीबीची कारवाई, लाचेच्या गुन्ह्यात केली वाढ

प्रतिनिधी १ जानेवारी

**कुटासा :** अकोला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाचेच्या प्रकरणात आरोपीला गुन्ह्यास प्रोत्साहन दिल्याप्रकरणी पोलीस नाईक विनोद आनंदराव खेडकर (५१) यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आल्याने पोलीस खात्यात एकच खळबळ उडाली आहे.

या प्रकरणी तक्रारदाराविरुद्ध पोलीस स्टेशन दहीहांडा येथे भारतीय न्याय संहिता व बीएनएस ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्याच्या तपासासंदर्भात तक्रारदार २७ जून २०२५ रोजी पोलीस ठाण्यात हजर झाला असता, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक कांबळे यांनी 'तुझ्या विरोधातील गुन्ह्यात मदत करतो' असे सांगत तब्बल १ लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने ३० जून २०२५ रोजी अकोला येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली त्यानुसार करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईत आरोपी कांबळे यांनी तडजोडीअंती ५० हजार रुपयांची लाच मागितल्याचे स्पष्ट झाले. यानंतर एसीबी पथकाने १६ जुलै २०२५ रोजी अकोला-अकोट मार्गावरील कासली फाटा येथे सापळा रचला. पंचासमक्ष तक्रारदाराकडून ५० हजार रुपये स्वीकारताच आरोपी कांबळे यांना एसीबीने रंगेहाथ पकडले. तपासादरम्यान मिळालेल्या पंचनामे व संभाषणाच्या आधारे पोलीस नाईक विनोद आनंदराव खेडकर नेमणूक पोलीस स्टेशन दहीहांडा, रा. म्हाडा कॉलनी, गजानन हॉस्पिटल समोर, अकोला यांनी आरोपी कांबळे यांना गुन्ह्यासाठी प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे त्यांच्यावरही गुन्ह्यात कलम वाढवून आरोपी करण्यात आले आहे. सदर कारवाई पोलिस अधीक्षक बापू बांगर, डीवायएसपी मिलिंदकुमार बहाकर यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली.

# मलकापूर येथे श्री विठ्ठल नाम कीर्तन उत्साहात संपन्न

प्रतिनिधी १ जानेवारी



**अकोला :** मलकापूर येथील गणेश नगर परिसरातील श्री वटकेश्वर शिव मंदिर येथे आज श्री विठ्ठल नाम कीर्तनाचा भक्तिमय कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे कीर्तन ह.भ.प. श्री संतोषदादा पिसे यांच्या सुमधुर आणि प्रभावी आवाजात संपन्न झाले.

या कीर्तन कार्यक्रमास प्रभाग १४ चे उमेदवार मंगेश रामभाऊ काळे, सौ. ज्योतीताई खिल्लारे, सौ. नम्रताताई धर्माळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच परिसरातील भजनी मंडळ व मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान ह.भ.प. संतोषदादा पिसे यांनी विठ्ठल नामस्मरणाचे महत्त्व सांगत उपस्थित भाविकांना भक्तीचा संदेश दिला. यावेळी सामाजिक व धार्मिक कार्यात योगदानाबद्दल मंगेश रामभाऊ काळे यांचा सत्कार करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रम भक्तिमय वातावरणात आणि शांततेत पार पडला. उपस्थित भाविकांनी कार्यक्रमाचे कौतुक केले.






# नाईक होमिओपॅथी येथे अनेक असाध्य आजारावर उपचार केले जातात

प्रतिनिधी १ जानेवारी

### ◆ ॲडव्हान्स होमिओपॅथी उपचार रुग्णांसाठी गुणकारी




**अकोला :** येथील नाईक होमिओपॅथी मध्ये थॉयरॉईड , लठ्ठपणा, ॲसीडीटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधीवात, मायग्रेन, पिसीओडी सारख्या असाध्य आजारावर उपचार करून रूग्णांना पुन्हा जीवन प्रवाहात आणण्याचे कौशल्य आहे. ॲडव्हॉन्सड् होमिओपॅथीच्या उपचाराने आजमितीस हजारो रूग्णांनी त्याचा लाभ घेतलेला आहे. गेल्या ४० वर्षापासून नाईक होमिओपॅथी येथे शरीराच्या सर्व आजारावर सर्वांगीण यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रूग्णांना कुठेही फायदा झाला नाही. अश्या रूग्णांनी एकदा अवश्य भेट द्यावी अधिक माहिती मोबाईल क्र. ९१७५९५७१२९, ९१३००१६१२९ व

Naikhomoeopathy.com

(Youtube) वर माहिती घ्यावी. रुग्णांनी अनुभव कथन केले आहे. माझे नाव किर्ती, नाईक होमिओपॅथी येथे येण्यापुर्वी मला थायरॉईड, पिसिओडी चा त्रास होता. हेअरफॉल व्हायचे, अनवानटेड हेअर ग्रोथ होत होती. शरीर भारी वाटायला लागले होते. खुप थकवा होता. झोप शांत लागत नव्हती. आता दोन महिन्याच्या उपचारानंतर माझे वजन कमी झाले. माझे पिरेडस् रेग्युलर व्हायला लागले. चेह-यावरची सुज कमी झाली. चिडचिडपणा कमी झाला. थकवा दुर झाला. आत्मविश्वास वाढला. होमिओपॅथीनेच आजार मुळापासून दुर होतात असा दावा केला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK